## बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक १७ | बुधवार,दि.३० मार्च २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## विज कर्मचारी अभियंता संघटनेसह आयटकने केला केंद्रसरकारच्या धोरणांचा विरोध




**गोंदिया:** केंद्र व राज्य सरकारच्या कामगार विरोधी धोरणाच्या विरोधात मंगळवार(दि.२९) वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी संयुक्त समितीचे सदस्यांनी संपावर जात आंदोलन केले. त्यामुळे राज्यात वीज निर्मितीत घट झाल्याचा आंदोलकांचा दावा आहे. या आंदोलनात वीज कंपन्यांतील तीन संघटना वगळून इतर ३९ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी सहभाग घेतला.केंद्र सरकार विद्युत सु-धारणा विधेयकातून सरकारी विद्युत कंपन्या उद्योजकांच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. हे खासगीकरण मान्य करणार नसल्याचे आंदोलकांनी सरकारला ठणकावून सांगितले.दरम्यान गोंदिया तालुक्यातील कामठा,बनाथर व कोचेवाही येथील शेतकरी संघटनांनी सुध्दा वीज कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठिंबा देत खासगीकरणाचा विरोध केला आहे.या आंदोलनात महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अधिकारी, अभियंता संघर्ष समिती व महाराष्ट्र राज्य विज कामगार कंत्राटी संघटना कृती समिती सहभागी झाले होते.आयटक,महाराष्ट्र हातपंप यांत्रिकी कर्मचारी संघटना,आशा वर्कर,अंगणवाडी कर्मचारी संघटनासह इतर कामगार संघटनासुध्दा या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.आयटकच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढून निदर्शने करण्यात आली.त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आयटकचे जिल्हा अध्यक्ष हौसलाल रहांगडाले,मिलिंद गणवीर,मुकुंद बडोले,नरेंद्र बागडे,रामचंद्र पाटील,शालू कुथे,करुणा गणवीर,शंकुतला फंटीग,चत्रुभूज लांजेवार,विजय चौधरी,प्रल्हाद उईके आदीनी निवेदन सादर केले.




## तोडगा न निघाल्यास राज्य अंधारात जाण्याची भीती

मागण्या पुर्ण होत नाही, तोपर्यंत संपावर ठाम राहण्याचा निर्धार वीज कर्मचाऱ्यांनी केल्यामुळे एसटी संपाप्रमाणेच आता वीज कर्मचाऱ्यांचा संपही चिघळण्याच्या मार्गावर आहे. संपावर लवकरात लवकर तोडगा न निघाल्यास संपुर्ण राज्यच येत्या २, ३ दिवसांत अंधारात जाण्याची भीती आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्यात अनेक भागांत कित्येक तास बत्ती गुल होती. त्यामुळे भर उकाड्यात नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागला.

दुसरीकडे, उर्जामंत्री नितीन राऊत यांनी कर्मचाऱ्यांना संप मागे घेण्याचे आवाहन करत कामगार संघटनांना बैठकीसाठी बोलावले होते. मात्र, ठोस आश्वासन मिळत नसल्याने कामगार संघटनांनी उर्जामत्र्यांच्या आवाहनालाहीी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आजची बैठकही रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे उर्जामत्र्यांनी आता कठोर पवित्रा घेत संपात सहभागी कर्मचाऱ्यांवर मेस्मा लावण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर आता दंडात्मक कारवाईदेखील होऊ शकते.वीजनिर्मिती प्रकल्पांकडे दोन दिवस पुरेल एवढाच कोळसा उप-लब्ध असल्याची माहिती राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी दिली. वीज निर्मिती आणि कोळसा पुरवठा करणाऱ्या अनेक केंद्रांवरच्या संघटनांनी संप पुकारल्याने लवकर यावर तोडगा न निघाल्यास वीज वितरण व्यवस्था कोलमडणार आहे.

## नदीत डोंगा पलटून घोनाडीच्या दोन महिलांचा मृत्यू

**चिचगडः-** गोंदिया जिल्ह्याच्या देवरी तालुक्यातील चिचगड अप्पर तहसील कार्यलय हद्दीतील घोनाडी गावाला लागुन असलेल्या गाढवी नदीत डोंगा पलटून यात बसलेल्या दोन महिला मजुरांचा पाण्यात बूडुन मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

आदिवासी नक्षलग्रस्त व जंगलव्याप्त असलेल्या चिचगड अप्पर तहसील कार्यालयाच्या हद्दीतील घोनाडी गावातील काही महिला व पुरूष मजुरी करुन २८ मार्च रोजी सायकांळच्या सुमारास नावेत(डोंग्यात) बसुन घोनाडी गावी परत येत होते. या नावेचे संतुलन बिघडल्याने नदीत नाव पलटी होवून बुडाली. त्यात घोनाडी येथील रेखा विजय वाढई (वय ३०) व मनिषा दिनु गुरनुले (वय ३१) या महिलांचा बुडून मृत्यू झाला.

घटनेची माहिती रात्री उशीरा पोलिसांनी मिळताच घटनास्थळी दाखल होत मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी पाठवले.

पोहता येणारे पडले बाहेर

नावेत एकुन ७ ते ८ लोक बसुन गावी कामावरुन परत येत होते. ज्या लोकाना पाण्यात पोहता आले त्यांनी स्वतःला वाचविले. परंतु रेखा व मनिषा यांना पोहता येत नसल्याने त्यांना बाहेर निघता आले नाही. यामुळे त्यांना जीव गमवावा लागला. गोठणगाव धरणात मोठ्याप्रमाणात पाणी असून या धरणाचे पाणी नदीमध्ये असते.त्यामुळे नदीपलीकडे असलेल्या शेतामध्ये भाजीपाला लावण्याकरीता दररोज घोनाडी येथील महिला पुरुष डोंग्याने(नाव) जातात,तसेच घटनेच्या दिवशीही गेले होते.

## वडिलांना व्हिडीओ कॉल करुन तरुणाची आत्महत्या

**गोंदिया-**शासकीय नोकरी लागत नसल्याने नैराश्यात गेलेल्या तरुणाने वडिलांना व्हिडीओ कॉल करुन कवलेवाडा धरणात आत्महत्या केल्याची घटना २८ मार्च रोजी उघडकीस आली. कृषीलेष राजू कनोजे (२९) रा. चंद्रशेखर वॉर्ड श्रीनगर, गोंदिया असे मृत तरुणाचे नाव आहे.

कृषीलेष हा सन २०13 पासूनू स्पर्धापरिक्षेची तयारी करत होता. मात्र सतत अभ्यास करुनही शासकीय नोकरी लागत नसल्याने तो नैराश्यात

गेला होता. दरम्यान २७ मार्च रोजी कृषीलेष हा दुपारी ३ वाजेच्या सुमारास कुटुबियांला न सांगता मोटरसायकल क्रमांक एमएच २९/एए

८३८२ ने घराबाहेर पडला. दरम्यान सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास कृषीलेशने वडिलांना व्हिडीओ कॉल करुन मी कवलेवाडा धरणात

आत्महत्या करीत असल्याचे सांगितले व मोबाईलमध्ये व्हिडीओ कॉल रेकॉर्डिग करुन धरणात उडी घेतली. याप्रकरणी मृतकृ कृषीलेशचा भा ऊ क्षितीज राजू कनोजे (२६) याने सिहोरा पोलसांनी दिलेल्या तोंडी तक्रारीवरून मर्ग नोंदवला.याप्रकरणात सिह-ोरा पोलीस तपास करीत असून मृतदेहाचा शोध घेत आहेत.

## बिरसी विमानतळावरील प्रवासी विमान सेवेला लागले ग्रहण

### वातावरण खराब असल्याचे कारण,१२ दिवसांत पाच वेळा खोडा

**गोंदिया:** बिरसी विमानतळावरुन बहुप्रतीक्षित विमानसेवा १३ मार्चपासून सुरू झाली. फ्लायबिग एअरलायंसच्या माध्यमातून ही सेवा सुरू झाली होती. मात्र १२ दिवसांतच विमानसेवेला ग्रहण लागल्याचे दिसून येत आहे. गोंदियातील वातावरण स्वच्छ राहत असताना देखील वातावरणाचे कारण दाखवत १२ दिवसांत तब्बल ५ वेळा बिरसी येथे न थांबताच विमान पुढच्या प्रवासाला निघाले. गुरुवारी सकाळीचे विमान वातावरण खराब असल्याचे सांगण्यात आले. तब्बल दीड वाजतापर्यंत विमान उतरले नसल्याने अखेर इंदोरला जाणाऱ्या २५ प्रवाशांना विमानतळावरून आपल्या घरी परतावे लागले.

बिरसी येथील इंग्रजकालीन विमानतळाला नवी झालर पांघरण्यात आली. त्यात विस्तीर्ण असे विमानतळ व वैमानिक प्रशिक्षण केंद्र तयार करण्यात आले. मात्र विमानतळ सुसज्ज असताना देखील प्रवासी विमान-सेवा सुरू झाली नव्हती. खासदार सुनील मेंढे यांच्या प्रयत्नामुळे अखेर केंद्रीय उड्डाण मंत्रालयाने परवानगी दिली. इंदोर ते हैदराबाद दरम्यान धावणाऱ्या फ्लायबिगने बिरसी विमानतळावरून प्रवाशांची ने-आण करण्याची इच्छा जाहीर केली. सर्व सोपस्कार आटोपून १३ मार्च रोजी केंद्रीय उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांनी हिरवी झेडी दाखवून विमानसेवेचा शुभारंभ केला. आता नियमित विमानसेवा सुरूराहिल असा समज झाल्यामुळे नागरिकांत उत्साहाचे वातावरण होते.

सकाळी ८.१० वाजता हैदराबाद येथून गोंदिया, ८.३५ वाजता गोंदिया ते इंदोर, ११.३५ गोंदियावरून हैदराबादकरिता विमान सुटतो. वाजता विमानतळावरून चांगला प्रतिसाद देखील मिळत होता. मात्र अल्पघटकेतच या विमानसेवेला ग्रहण लागले. मात्र या १२ दिवसांच्या काळात तब्बल पाच वेळा खराब वातावरणाचे कारण सांगून बिरसी विमानतळावर विमान उतरलेच नाही. तास दीडतास हवेत घिरट्या घेतल्यानंतर बिरसी येथील प्रवाशांना न उतरवताच इंदोरकडे रवाना झाले.




### आयएलएफ यंत्रणेचा अभाव

**आकस्मिक लँडिगकरिता विमानतळांवर इन्स्ट्रूमेंट लँडिंग सिस्टम (आयएलएफ) असते. परंतु, बिरसी येथील विमानतळावर ती व्यवस्था नाही. येथील विमानतळावर वैमानिक प्रशिक्षण केंद्र देखील आहे. त्यामुळे ती सेवा येथे असणे गरजेची आहे. ती सेवा नसल्यामुळे भविष्यात आणि हिवाळ्यातील विमानसेवेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

### सोयी-सुविधांचा अभाव

**गोंदियावरुन बिरसी विमानतळ २० किलोमीटर अंतरावर आहे. येथून विमानतळावर ये-जा करण्याकरिता वाहन उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रवाशांना प्रवासी वाहन घेतील तेवढे पैसे देवून प्रवास करावा लागत आहे. त्याचबरोबर विमानतळावर नास्टा, जेवणासाठी कॅटीनची देखील सोय नाही.त्यामुळे विमानाला उशिर झाल्यास उपाशीपोटीच वेळ काढावा लागत आहे.**

### प्रवासी वाहतूक सुरु होऊनही विमानतळावर प्रवेशासाठी पोलिसांचा ससेमिरा

**देशातील कुठल्याही विमानतळावर प्रवाशांना सरळ प्रवेश करावयास मिळते. मात्र गोंदियाच्या विमानतळावर आतील लाँजपासून अर्धाकिलोमीटर अंतरावर मुख्य मार्गावर असलेल्या प्रवेशद्वारावरच पोलिसांकडून अडवणूक करुन तिथेच आधी चौकशी केली जाते. जेव्हा की प्रवाशांना सरळ आतमध्ये प्रवेश करुन विमानतळाच्या आत लाँजमध्ये प्रवेश करतांना तिथे आपले बोडीगपास चेक करायचे असते. परंतु गोंदियाच्या विमानतळावर मात्र सुरक्षेच्या नावावर विमानतळ प्राधिकरणाच्या नावावर पोलिसांच्यावतीने अडवणुकीचे धोरण अद्यापही सुरुच आहे.**

गुरुवारी देखील हैदराबादवरून येणारा विमान तब्बल १.३० वाजतापर्यंत उतरलाच नाही. हैदराबादवरून येणाऱ्या प्रवाशांना घेवून तो विमान इंदौरला निघाला. त्याचप्रकारे बिरसी विमानतळावरून इंदोरला जाणाऱ्या प्रवाशांचा देखील हिरमोड झाला. तब्बल २५ प्रव-ासी दीड वाजतापर्यंत थांबून आपल्या घराकडे रवाना झाले. तिकीट काढून देखील प्रवास न झाल्याने प्रवाशांनी तिकीट परत मागण्याकरिता रोष व्यक्त केला.


उल्लेखनीय म्हणजे गोंदियातील वातावरण स्वच्छ असल्यामुळे येथील विमानतळावर इंदिरा गांधी वैमानिक प्रशिक्षण संस्था रायबरेलीसह एक खासगी कंपनी वैमानिकाचे प्रशिक्षण देत आहे. त्या प्रशिक्षणार्थ्यांचे विमान मात्र त्या वेळेत आकाशात घिरट्या घालत होते. गुरुवारी जिल्ह्याचे वातावरण स्वच्छ होते, असे असताना देखील खराब वाता-वरणाचे कारण सांगणे म्हणजे फसवणूक असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. मोठ्या प्रतीक्षेनंतर सुरू झालेली विमानसेना बंद करण्याकरिता हा घाट रचला जात असल्याचा आरोप देखील प्रवाशांकडून होत आहे.

यासंदर्भात बिरसी विमानतळाचे निदेशक के.व्ही. बैजू यांच्याशी संपर्क करुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने त्यांची भूमिका स्पष्ट कळू शकली नाही.

## भुमिगत गटार योजनेच्या कामाने शहरवासीयांच्या नाकात दम

### कामात अनियमितता, नागरिकांना मनस्ताप

**गोंदिया :** गोंदिया शहरात विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून भुमिगत गटार योजनेला मंजूरी देण्यात आली. दरम्यान मागील दोन वर्षभरापासून शहरात भुमिगत गटार योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू आहे. मात्र सदर योजनेचे काम नागरिकांसाठी डोकेदुखीचे ठरले आहे. कामात नियोजनााचा अभाव असल्याने शहरवासीयांच्या नाकात दम आले आहे. अनेक ठिकाणी काम अर्धवट पडून आहे. त्यामुळे नागरिकांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागत आहे.



गोंदिया शहरात अमृत योजनेतंर्गत भुमिगत गटार योजनेला मंजूरी मिळाली. त्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनेच्या कामाला मागील दोन वर्षापासून सुरूवात करण्यात आली आहे. जसजसे योजनेचे काम समोर वाढत आहे. तसतसे नागरिकांची डोकेदुखी वाढत आहे. पाईपलाईन करीता शहरातील रस्ते खोदून काढण्यात आले. दरम्यान खोदकामात निघ-ालेला मलबा रस्त्याच्या कडेला टाकण्यात आला. काम होवूनही या मलब्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली नाही. त्यामुळे अनेक भागात मलबा जैसे थे! च्या परिस्थितीत पडून आहे. तर दुसरीकडे कामात सातत्य नसल्याने काम अनेक ठिकाणी अर्धवट पडून आहे. खोदकाम करून ते काम पूर्ण न करता तसेच सोडून देण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. याकडे वारंवार संबधित विभाग व कंत्राटदाराचे लक्ष वेधून दुर्लक्ष करण्यात येत आहे. तर नगर परिषद आपली भुमिका नसल्याचे सांगून मोकळी होत आहे. या प्रकारात सर्वसामान्य नागरिक भरडला जात आहे.

शासनाने दोन विभाग एकमेकांकडे बोट दाखवून वेळ मारून नेत आहेत. यामुळे जनसामान्यात संताप व्यक्त केला जात आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देवून उपाययोजना करावी, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

**मलब्याने नाल्या तुंबल्या**

शहरातील शास्त्री वॉर्ड येथील महालक्ष्मी राईसच्या मागील भागात ४ महिन्यापूवी भुमिगत गटार योजनेचे काम सुरू झाले होते. ते काम पूर्णही झाले. परंतु, रस्त्यावर काही ठिकाणी मलबा पडून आहे. तर एका ठिकाणाहून रस्त्याचे सिमेंटीकरण करण्यात आले नाही. यामुळे दुचाकी, चारचाकी चालकांना खड्ड्यातून वाहन काढावे लागत आहे. तर अनेक दुचाकींचे अपघाताच्या घटनेत वाढ झाली.

रस्त्यावरील मलब्याने नाल्या तुंबल्या आहेत. यामुळे सांडपाण्याची निकासी होत नाही. याचा फटका नागरिकांना बसत आहे. नाल्यांच्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. याकडे दुर्लक्ष होत आहे. या संदर्भात येथील सुज्ञ नागरिकाने कंत्राटदाराला संपर्क साधून ही बाब निदर्शनास आणून दिली. दरम्यान दोन अभियंत्यांनी शास्त्री वॉर्ड येथे भेट देवून चार दिवसात समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

**माहिती देवूनही दुर्लक्ष**

समस्येला घेवून शास्त्री वॉर्ड येथील काही नागरिकांनी माजी नगरसेवकांना पाचारण केले. दरम्यान समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. एवढेच नव्हेतर नगरसेवकांनी संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर चर्चा करून व्हिडीओ कॉलिंगच्या माध्यमातून समस्या निदर्शनास आणून दिली. तसेच उपाययोजना करण्याची मागणी केली. परंतु, त्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळे या समस्येकडे लक्ष कोण देणार? याकडे लक्ष लागले आहे.

### मराठवाडा, विदर्भात उष्णतेची लाट

पुढील चार दिवस राज्यावर उष्णतेच्या लाटेचे सावट आहे. या काळात मराठवाडा आणि विदर्भातील काही शहरांचे तापमान ४३ ते ४४ अंशांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. तापमान वाढत असल्याने सूर्याचा यूव्ही इंडेक्स (अतिनील किरणे) ११ या सर्वाधिक जोखमीच्या पातळीवर असेल. त्यामुळे पुढील चार दिवस सकाळी १० ते दुपारी ४ वाजेदरम्यान थेट सूर्यप्रकाशात जाणे धोक्याचे ठरणार आहे.

## धर्म व वर्णव्यवस्थेतून बहुजन समाजाला संविधानिक अधिकारापासून डावलण्याचे काम सुरु



**गोंदिया:** बामसेफ हे प्रशिक्षणातून कार्यकर्ते घडविणारे संघटन आहे.प्रशिक्षणातून चांगले व्यक्ती व कार्यकर्ते निर्माण होतात.जाती आणि वर्णव्यवस्थेवर निर्माण झालेल्या समाजाच्या रचनेत उच्चनिचता निर्माण झाली आहे.यासाठी एका विशिष्ठ समाजाने तशी रचना धर्माच्या नावावर करुन ठेवली आहे.या व्यवस्थेला तोडण्यासाठीच आपल्याला प्रशिक्षणाच्या माध्यमातून काम करायचे आहे.पाच हजारवर्षापासून ही व्यवस्था सुरु आहे,त्या व्यवस्थेला आमच्या महापुरुषांनी काही प्रमाणात तोडण्याचे काम केले आहे.ही जातीयवादी वर्णव्यवस्था समजून घेणे महत्वाचे झाले आहे.त्यासाठीच आपल्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला देशामध्ये प्रशिक्षित कार्यकर्ते घडविणाऱ्या मोजक्याच संघटना असून यामध्ये कम्युनिस्ठ संघटना नंतर आरए-सएस व बामसेफचा यात समावेश होतो.देशातील ५०० हून अधिक जिल्ह्यात बामसेफने आपले संघटन निर्माण केले आहे.समाजाला काही देणे आहे,या उद्देशाने पे बँक टु सोसायाटी हे धोरण राबवून बहुजन समाजाला ब्राम्हणवाद्यांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या संघटनाना बळकट करण्याचे काम देशव्यापी सुरु असल्याचे प्रतिपातदन भारत मुक्ती मोर्च्याचे राज्य उपाध्यक्ष कमलेश सुतार यांनी व्यक्त केले.

ते एक दिवसीय जिल्ह-ास्तरीय प्रशिक्षण शिबिर रविवार (दि.२७) येथील रमाबाई आंबेडकर शाळा सिंगलटोली येथे आयोजित करण्यात आले होते,त्यावेळी प्रशिक्षक म्हणून बोलत होते. प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन ओबीसी चळवळीचे कार्यकर्ते व बेरार टाईम्सचे संपादक खेमेंद्र कटरे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख उपस्थितीमध्ये ओबीसी सेवा संघ जिल्हा संघटक भुमेश शेंडे, शिक्षक रामभगत पाचे,धम्मदीप नंदेश्वर, हंसकला गणवीर, राजु कामत, परमाचंद मेश्राम, अनमोल साखरे, बर्धिनी संघ अध्यक्ष ममता राऊत, जिल्हा अध्यक्ष विनोद गेडाम यांच्यासह मोठ्या संख्येने प्रशिक्षक उपस्थित होते.कटरे यांनी ओबीसी समाजाचे संविधानिक अधिकार मनुवादी हिरावून घेत असतानाही समाज आज मनुवाद्यांनी विणलेल्या जाळ्यातच गुरफटून बसल्याचे सांगितले.

## पाच वर्षात जिल्ह्यात सरासरी ०.५९ मीटरने भूजलपातळीत वाढ

### ऑक्टोंबर २१ ते जानेवारी २२ मध्ये ०.०६ मीटरने भूजलपातळीत वाढ



**गोंदिया जिल्ह्यातील जानेवारी २०२२ ची भूजल स्थिती**

| तालुका | पाच वर्षांची सरासरी | भूजल स्तर | झालेली वाढ |
|---|---|---|---|
| आमगाव | ६.४ | ९६.१९ | +०.३० |
| अर्जुनी मोरगाव | ४.९९ | ४.५६ | +०.४३ |
| देवरी | ४.७५ | ३.९४ | +०.८२ |
| गोंदिया | ५.१० | ४.९६ | +०.१४ |
| गोरेगाव | ७.३० | ६.६३ | ०.६७ |
| सडक अर्जुनी | ७.६० | ७.०७ | +०.५३ |
| सालेकसा | ५.६९ | ४.३० | +१.३९ |
| तिरोडा | ५.०२ | ४.५७ | +०.४५ |
| एकूण सरासरी | ५.८७ | ५.२८ | +०.५९ |

**गोंदिया जिल्ह्यातील ऑक्टोंबर २०२१ची भूजल स्थिती**

| तालुका | पाच वर्षांची सरासरी | भूजल स्तर | झालेली वाढ |
|---|---|---|---|
| आमगाव | ३.३९ | २.१५ | +१.२४ |
| अर्जुनी मोरगाव | १.८० | १.५८ | +०.२२ |
| देवरी | १.६५ | ०.९३ | +०.७२ |
| गोंदिया | १.७५ | १.३७ | +०.३८ |
| गोरेगाव | ४.५३ | ४.७५ | −०.२२ |
| सडक अर्जुनी | ४.१४ | ३.७० | +०.४४ |
| सालेकसा | २.०४ | १.०९ | +०.९५ |
| तिरोडा | २.१४ | १.६१ | +०.५३ |
| एकूण सरासरी | २.६८ | २.१५ | +०.५३ |

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:** यंदाच्या मोसमात उशिराने सुरूझालेल्या पण जोरदार हजेरी लावणा?या पावसामुळे परिणामी भूजल पातळीत वाढ झाली आहे. गत पाच वर्षांच्या सरासरीच्या भूजल पातळीच्या तुलनेत ही वाढ झाल्याची नोंद भूजल विकास आणि सर्वेक्षण यंत्रणेने एका पाहणीत घेतली आहे.पाच वर्षात जिल्ह्यात सरासरी ०.५९ मीटरने वाढ झाली असून ऑक्टोंबर २१ ते जानेवारी २२ या ४ महिन्यात ०.०६ मीटरने वाढ झाली आहे. मान्सून पूर्व आणि मान्सून पश्चात असे सर्वेक्षण या यंत्रणेद्वारे करण्यात येते.वरिष्ठ भूवैज्ञानिक (त्र्शेश्रेसळलरश्र डींीशू) विभागाकडून वर्षातून चारवेळा भूजल पातळीचे निरीक्षण करण्यात येते. जानेवारी, मार्च, मे व ऑक्टोबर या महिन्यांत निरीक्षण करण्यात येते. गोंदिया जिल्ह्या-तील ३३ पाणलोट क्षेत्रातील ७९ विहिरींचे निरीक्षण करण्यात आले.गेल्यावर्षी ऑक्टोंबर २०२१ मध्ये निरिक्षण केलेल्या सरासरी पाणी पातळीमध्ये ०.५३ मीटरदरम्यान वाढ झाली होती.त्यात वाढ होऊन जानेवारी २२ मध्ये ०.५९ मीटरने वाढ झाली आहे. याचा फायदा सर्वांनाच होणार आहे. याचा अर्थ पाण्याचा अतिरिक्त वापर करा, असा होत नाही. मे व जून महिन्यात ही पातळी खालाविण्याची शक्यता आहे. भूजलातील उपसाही आटोक्यात ठेवावा लागेल. दोनशे फुटांपेक्षा जास्त खोल बोअरवेल खोदू नये, असे भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा गोंदियाचे प्रभारी वरिष्ठ भूवैज्ञानिक सचिन एस खोडे यांनी सांगितले. जिल्ह्यात चिकन मातीचे प्रमाण अधिक असल्याने विहीरीसंह विंधन विहिरींना पाझर झरे सहसासहजी लागत नाही.गोंदिया जिल्ह्यात गत पाच वर्षांत भूजल पातळी सरासरी ०.५३ मीटर इतकी नोंदविली गेली.जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात पाच वर्षाच्या सरासरीत भूजल पातळीत वाढ नोंदविण्यात आली असली तरी गोरेगाव तालुक्यात मात्र −०.२२ मीटरने कमी झा-लेली आहे.

**भुजल सर्वेक्षण विभागात रिक्त पदांचा डोलारा**

गोंदिया जिल्ह्यातील भुजल सर्वेक्षण कार्यालय हे अर्धवट कर्मचारीयांच्यावर सुरु असून गेल्या २०१८ पासून वरिष्ठ भूवैज्ञानिकाचे पद रिक्त आहे.या पदावर प्रभारीच कार्यरत आहेत.या विभागासाठी १७ पदे मंजूर असली तरी सध्याच्या घडीला फक्त ७ पदेच भरली आहेत.त्यापैकी दोन पदे ही परिचर व वाहनचालकांची आहेत. सहा.भुवैज्ञानिकाकडे वरिष्ठ भुवैज्ञानिकाचे पदभार आहे.तर कनिष्ठ भुवैज्ञानिकाचे १ पद रिक्त आहे. जिल्ह्यात या विभागामार्फत पाणी तपासणी प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.त्याठिकाणी कंत्राटी कर्मचारी प्रयोगशाळेतील तपासणीचे काम सांभाळत आहेत.

## संपादकीय

# सेवा म्हणता, तर मग मेवा कशाला?

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार विविध कारणांनी मागील दोन अडीच वर्षांपासून सतत चर्चेत आहे. कधी शिक्षण तर कधी कोरोना तर कधी मंर्त्यांमधील भ्रष्टाचार व घोटाळ्यामुळे तर कधी शेतकऱ्यांच्या वीज तोडणीमुळे सरकार सतत चर्चेत आहे. आता सरकारने आमदारांसाठी मोफत घरे बांधून देण्याची अफलातून घोषणा केल्याने परत एकदा सरकारला जनतेला उत्तर द्यावे लागत आहे.

मुंबईमध्ये ३०० आमदारांना म्हाडातर्फे कायमस्वरुपी घरे देण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अधिवेशना दरम्यान केली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सभागृहात काय म्हणाले ते बघा. लोकांच्या घरांचा प्रश्न आणि लोकप्रतिनिधी यांच्या घराचाही प्रश्न आहे. आमदारांना घरेही मिळणार आहेत. ३०० घरे आमदारांसाठी बांधणार आहोत, सर्वपक्षीय आमदारांना घरे आवश्यक आहेत, आमदारांनाही चांगल्या घरांची गरज आहे, कायमस्वरुपी घरे देणार असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सभागृहात म्हणाले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची घोषणा व जितेंद्र आव्हाड यांनी केलेली सारवासारव किती विचित्र व गोरगरिबांची चेष्टा करणारी आहे याचा सरकारने विचार करण्यासारखा हा प्रश्न आहे.

एकीकडे राज्यात घरकुलाचा प्रश्न, एसटी कर्मचाऱ्यांचा प्रश्न, शिक्षण, बेकारी, स्त्रियांच्या वाढत्या आत्महत्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, विजेचा प्रश्न सरकारमधील मंत्र्यांच्या घोटाळ्याचे व भ्रष्टाचाराचे प्रश्न उपस्थित असताना सरकारने आमदारांसाठी घरे बांधून देण्याची घोषणा केली. आमदारांचे हे लाड कशासाठी? खरंच महाराष्ट्राचे आमदार इतके गरीब झालेत? झोपडपट्टी फुटपाथावर राहणाऱ्या गरिबांपेक्षा यांची इतकी दैना झाली? मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा सर्वसामान्य जनतेच्या मनात चीड निर्माण करणारी आहे. आज घरांची व निवाऱ्याची खरी गरज कोणाला आहे? ऐशआरामात राहणाऱ्या आमदार-खासदारांना की झोपडीत राहणाऱ्यांना की फुटपाथावर जीवन जगणाऱ्या दीन दुबळ्यांना? याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. अलीकडच्या काळात पेन्शन हा मुद्दा चांगलाच चर्चेत आला आहे. २००५ नंतरच्या सरकारी नोकरांना पेन्शन योजना बंद करण्यात आली आहे. त्याच्या बदल्यात सरकार आणि कर्मचारी यांच्या संयुक्त गुंतवणुकीतून सेवा नवृत्तीनंतर काही ठराविक रक्कम दर महिन्याला कर्मचाऱ्याला दिली जाणार आहे. मात्र ही योजना सरकारी कर्मचाऱ्यांना नको आहे, आम्हाला जुनी पेन्शनच दिली जावी अशी मागणी केंद्र आणि राज्य सरकारांच्या कर्मचाऱ्यांनी केली आहे. यासाठी सातत्याने आंदोलने केली जात आहेत. काही राज्ये जुनी पेन्शन आपल्या कर्मचाऱ्यांना देत आहेत तर राजस्थान आणि छत्तीसगडसारख्या राज्यांनी जुनी पेन्शन योजना देण्याचे कबूल केले आहे. परवा महाराष्ट्राच्या विधिमंडळातही याबाबत चर्चा झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी जुनी पेन्शन योजना लागू करणं आर्थिकदृष्ट्या अशक्य असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे राज्यातील कर्मचारी नाराज झाले आहेत. ते आंदोलन करण्याच्या तयारीत असताना तिकडे पंजाबमधून एक चांगली बातमी तमाम जनतेला सुखावणारी आली आहे. तिथल्या माजी आमदारांची पेन्शन बंद करण्यात आली आहे.

खरे तर प्रत्येक राजकारणी जेव्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरतो तेव्हा तो लोकांना सेवेची संधी मागतो, पण निवडणूक जिंकल्यानंतर तो सेवा करो अथवा न करो, परंतु आयुष्यभर मेवा मात्र नक्कीच खात असतो. अर्थात निवडणूक जिंकल्यानंतर दोन चार दिवस विधिमंडळात गेला तरी आणि पुन्हा कधीही निवडणूक लढवली नाही किंवा जिंकली नाही तरी, त्याला पेन्शन आणि आयुष्यभराच्या अनेक सुविधा मिळत राहतात. जर एखाद्या नेत्याने अनेक वेळा निवडणूक जिंकली असेल, तर त्यानुसार त्याच्या पेन्शनची रक्कमदेखील प्रति टर्मच्या आधारावर वाढते. अशा प्रकारे अनेक राजकारण्यांना दरमहा पाच लाख रुपयांहून अधिक पेन्शन मिळते. पंजाबच्या नव्या सरकारने या पेन्शनवरच बंदी घातली आहे. आता आमदारांना एका टर्म एवढीच पेन्शन मिळणार आहे. सध्या पंजाबमधील आमदारांना एका टर्मसाठी पंचाहत्तर हजार एकशे पन्नास रुपये पेन्शन मिळते. साहजिकच पंजाब सरकारच्या या निर्णयाचे सर्वसामान्यांकडून चौफेर स्वागत होत आहे. इतर राज्य सरकारांनी आणि केंद्र सरकारनेही हा निर्णय उदाहरण म्हणून लक्षात घेऊन काही व्यावहारिक पावले उचलावीत, अशी अपेक्षा केली जात आहे. राज्यातील आर्थिक संकट दूर करण्याच्या उद्देशाने पंजाब सरकारने हा निर्णय घेतला आहे. देशातील सर्वच राज्ये आर्थिक संकटाचा सामना करत आहेत, त्यामुळे त्यांच्याकडूनही असे निर्णय अपेक्षित आहेत.

काही काळापासून पेन्शनचा मुद्दा सातत्याने चर्चेला येत आहे. अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन बंद करण्यात आली होती. तेव्हापासून केंद्र आणि राज्य कर्मचारी वर्ग त्याची पुन्हा अंमलबजावणी करण्याची मागणी करत आहेत. उत्तर प्रदेश निवडणुकीदरम्यान, सर्व राजकीय पक्ष मोफत योजनांची लोकभावना आश?वासने देत असताना, सपाने जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आश?वासन दिले. ते आश्वासन पाळत आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन राजस्थान आणि छत्तीसगड सरकारने जुनी पेन्शन योजनाही लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

खासदार-आमदारांची पेन्शन बंद नसताना फक्त सरकारी कर्मचाऱ्यांनाच का ही शिक्षा केली जात आहे, असा प्रश्न पुन्हा जोमाने उपस्थित केला जात होता. सेवा म्हणून आमदार मंडळी विधिमंडळात आले असताना त्यांना पेन्शनची गरज काय? शेवटी कर्मचाऱ्यांनाही नवृत्तीनंतर कुटुंब चालवावे लागते. मग कुठे आहे सामाजिक न्याय? असा सवाल उपस्थित केला जात असताना या दृष्टीने पंजाब सरकारच्या ताज्या निर्णयाचे स्वागत होत आहे. यापूर्वी हरियाणा सरकारने आमदारांच्या पेन्शनची रक्कम एक लाख रुपयांपर्यंत मर्यादित केली आहे. मात्र तो निर्णय दोन हजार चौदा नंतरच्या आमदारांनाच लागू आहे. त्यामुळे सुमारे अडीचशे आमदार जुन्या नियमानुसार लाखो रुपयांची पेन्शन घेत आहेत.

आमदार-खासदारांच्या पेन्शनमुळे जनतेत असंतोष आहे, कारण निवडणुका जिंकल्यानंतर बहुतांश नेत्यांच्या संपत्तीत अनेक पटींनी वाढ झाल्याची नोंद आहे. निवडणूक जिंकताच ते रातोरात श्रीमंत होतात. असे असतानाही त्यांना आमदार पदावरून पायउतार झाल्यावरही लाखो रुपये पेन्शन मिळते. अनेकजण खासदार आणि आमदार या दोघांची पेन्शन घेतात. शिवाय त्यांना मेडिकल, ट्रॅव्हल्स वगैरेचे भत्ते आणि सुविधा मिळत राहतात. त्यामुळे राज्य सरकारांवर मोठा आर्थिक बोजा पडतो. राजकारणी जेव्हा सेवेच्या उद्देशाने राजकारणात येतात तेव्हा त्यांना पेन्शनची गरजच काय, असा पंजाबच्या मुख्यमर्त्यांचा केलेला युक्तिवाद रास्त आहे. पंजाब सरकारने देशात एक चांगला आदर्श घालून दिला आहे, त्याचे अनुकरण किती राज्ये करतात, हे पाहायला हवे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# कत्तलखोरांच्या तावडीतून मुक्त केलेले ते जनावरे गेले कुठे?

**गोंदिया:** गोवंश हत्याबंदी व प्राणी संरक्षण अधिनियमाची अंमलबजावणी करीत असताना पोलिस विभागाकडून कत्तलीसाठी जनावरे घेवून जाणाऱ्या वाहनांसह संबधितांवर कारवाई केली जाते. कारवाई दरम्यान कत्तलखोरांच्या तावडीने जनावरांची सुटका करण्यात येते. सुटका करण्यात आलेल्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी किंबहुना गौशाळेत पाठविले जाते. जेणेकरून त्या जनावरांचे पालन-पोषण योग्य पध्दतीने व्हावे, असे त्या मागचे उद्देश आहे. या अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील पोलिस स्टेशनकडून गेल्या दोन वर्षांत केलेल्या कारवाईत ३८२६ जनावरांची सुटका करण्यात आली. त्यातील फक्त ६७८ जनावरे गौशाळेत पाठविण्यात आले आहे. ही बाब माहितीच्या अधिकार अधिनियमातंर्गत उघडकीस आली आहे. त्यामुळे उर्वरित जनावरे गेले कुठे? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. त्याचप्रमाणे हेच काय, गौरक्षण? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

गौवंश हत्याबंदी व प्राणी संरक्षण अधिनियमाच्या अंमलबजावणी अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात सामाजिक संघटनांच्या मदतीने अनेक पोलिस कारवाई केली जाते. यासाठी आरटीआय कार्यकर्ते रोशन बडोले यांनी सर्व पोलिस स्टेशनकडे माहिती अधिकार अधिनियमातंर्गत गेल्या दोन वर्षात किती जनावरांची कत्तलखोराच्या तावडीतून सुटका करण्यात आली. या बाबतची माहिती मागितली. पोलिस विभागाकडून दिलेल्या माहितीवरुन कत्तलखोराच्या तावडीतून मुक्त झालेले जनावरे पोलिसांच्या दुर्लक्षामुळे गेले कुठे? ही बाब समोर आली आहे. यामुळे गौरक्षणाचा विषय हा जरी गंभीर असला तरी कायद्याची अंमलबजावणी करणारेच जनावरांच्या जीवाशी खेळ खेळ असल्याचे समोर आले आहे.



गोंदिया जिल्ह्यातील एकूण चार पोलिस उपविभागातंर्गत येणाऱ्या पोलिस स्टेशन हद्दीत गेल्या दोन वर्षांत अनेक कारवाईच्या माध्यमातून जनावरांची सुटका करण्यात आली. एकूण ३८२६ जनावरे कारवायातंर्गत जप्त करण्यात आले. मात्र, त्यातील फक्त ६७८ जनावरे विविध गौरक्षण शाळेत पाठविण्यात आल्याची नोंद आहे. तर गंगाझरी पोलिस ठाण्याने केलेल्या कारवाईतून जप्त केलेले जनावर कुठे गेले? याची साधी माहितीही देण्यात आली नाही. तसेच २६ जनावरे अर्जुनी मोरगाव पोलिसांनी कोर्टाच्या आदेशान्वये पशुपालकांना परत केले. उर्वरित ३१२२ जनावरे गेली कुठे? या प्रश्नाचे उत्तर पोलिस विभागाच्या प्रामाणिक कर्तव्याच्या फाईलमध्येच दडले आहे. हा सर्व प्रकार आरटीआय कार्यकर्ता रोशन बडोले यांनी मागितलेल्या माहितीवरुन समोर आला आहे.

**पाच पोलिस स्टेशनकडील जनावरे गेली कुठे?**

जिल्ह्यातील पाच पोलिस स्टेशनकडे कारवाई अंतर्गत सुटकुठे कुठे पाठविण्यात आली. या बाबीची कसलीही नोंद नाही. यामध्ये सालेकसा, गंगाझरी, रामनगर व केशोरी या पोलिस ठाण्यांचा समावेश आहे. या पोलिस ठाण्याकडून अनुक्रमे ८७५ व २५, १०५ व ७०९, १९४, ८ जनावरे सुटका करुन जप्त करण्यात आले होते. विशेष म्हणजे, दवनीवाडा पोलिस स्टेशनकडून कारवाईत किती जनावरे जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या जनावरांना कुठे पाठविण्यात आले. या बाबीची कसलीही माहिती नाही. यावरुन गोंदिया जिल्हा पोलिस जनावरांच्या संरक्षणासंदर्भात किती उदासीन आहे? ही गंभीर बाब मंथनाची ठरली आहे.

**दोन वर्षात पोलिस कारवाईत सुटका केलेली जनावरे**

गेल्या दोन वर्षात प्राणी संरक्षण कायद्यातंर्गत जिल्ह्यातील पोलिस स्टेशन हद्दीत केलेल्या कारवाईत ३८२६ जनावरांची सुटका केली. यामध्ये गोंदिया उपविभागातंर्गत येणाऱ्या गोंदिया ग्रामीण पोलिस स्टेशनकडून १९ जनावरे, पोलिस स्टेशन गोंदियाकडून १९४ जनावरे, रावणवाडी पोलिस स्टेशनकडून २३८ लहान-मोठे व २०० शेळ्या, उपविभाग आमगाव अंतर्गत येणाऱ्या आमगाव पोलिस स्टेशनकडून ८७ जनावरे, गोरेगाव २८७ जनावरे, सालेकसा ८७५ जनावरे व २९ शेळ्या. तिरोडा उपविभागातंर्गत येणाऱ्या तिरोडा पोलिस स्टेशनकडून ३२३ जनावरे, गंगाझरी १०५ व ७०९ शेळ्या. देवरी उपविभागातंर्गत येणाऱ्या देवरी पोलिस स्टेशनकडून ३८६, डुग्गीपार ४७६, चिचगड ४११, नवेगावबांध ३५०, अर्जुनी मोरगाव ६७ व केशोरी ८ जनावरांचा समावेश आहे.

**गौशाळेत पाठविलेले जनावरे**

विविध कारवाईतून सुटका केलेल्या जनावरांना पोलिस स्टेशनकडून ६७८ जनावरे गौशाळेत पाठविण्यात आले. यामध्ये अर्जुनी मोरगाव पोलिस स्टेशन ३२, नवेगावबांध ११७, देवरी १७१, गोरेगाव ८०, तिरोडा १००, गोंदिया १९, चिचगड ५८, आमगाव १३ व रावणवाडी पोलिस स्टेशनकडून ८८ जनावरे पाठविण्यात आली आहे

**गौरक्षणाचा विषय गंभीर मात्र पोलिस उदसीन : रोशन बडोले**

राज्य शासनाकडून गौवंश हत्याबंदी कायदा करण्यात आला आहे. त्यामुळे गौरक्षणाचा विषय फार गंभीर आहे. या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत असली तरी जनावरांच्या पालन-पोषणाचा प्रश्न तेवढा गंभीर नाही. हे आपण घेतलेल्या माहितीवरून समोर आले आहे. पोलिस विभागाने गेल्या दोन वर्षात अनेक जनावरांची कत्तलखोरांच्या तावडीतून सुटका केली. ही उल्लेखनिय कामगिरी असली तरी पोलिस विभागाच त्या जनावरांचा संरक्षणाला घेवून उदासीन दिसून येत आहे. यामुळे पोलिस विभागाच्या कर्तव्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशी प्रतिक्रिया आरटीआय कार्यकर्ता रोशन बडोले यांनी व्यक्त केली.

# ओबीसीसह बहुजनांनो आता वाट कशाची बघता?

भारतात नीच मनोवृत्तीचे लोक उच्च म्हणून मिरवितात आणि याला आधार मनुस्मृतीचा देत मनुस्मृतीतील निर्देश उत्तम आहेत, असा ढिंडोराही खूप बडवून बडवून पिटतात. एकतर मनुस्मृती हा स्मृतीग्रंथ संस्कृत मध्ये आहे व त्याचे इतर भाषांमध्ये झालेले भाषांतर हे सुध्दा ब्राह्मण लोकांनीच केले आहे. ब्राह्मणेतर असलेल्या शुद्र वर्णातील लोक आणि तमाम स्त्रियांना कसे वागवावे/ छळावे याचे निर्देश हे मनुस्मृतीत लिहिले आहे. ब्राह्मणेतरांसह शुद्र वर्णातील लोकांनी हा ग्रंथ (आपल्या भाषेतील भाषांतरीत प्रत) वाचून ब्राह्मणांसह त्रैवर्णिकांनी त्यांना कसे छळावे व वाळीत टाकणारी अशी तिरस्कृत व उत्पीडित करणारी सामाजिक वागणूक कशी द्यावी ? याचा लेखाजोखाच लेखी स्वरूपात मनुस्मृतीने सादर केलेला आहे. मनुस्मृती म्हणजे social criminology चे दस्तावेज आहे व त्याला धर्माची मान्यता आहे, हे कसे? हे समजून उमजून घ्यावे. समाजात क्रिमिनल लोकांना मान नसतो तर त्यांचा धाक असतो. ब्राह्मणांचेही असेच असल्यामुळे त्यावर प्रतिक्रिया देत डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली होती. ती का जाळली? हे समजून घेण्यासाठी स्वतःला हिंदू म्हणविणाऱ्या अठरापगड बलुतेदार असलेल्या ओबीसी प्रवर्गीय लोकांनी मनुस्मृती ही नक्कीच न चुकता एकदातरी, आवडो अथवा न आवडो, जरूर जरूर वाचावी. ब्राह्मण लोक हे किती नीच मानसिकतेचे असतात हे मनुस्मृती हा ग्रंथच तुम्हाला सांगेल. खरेतर बलुतेदार असलेला ओबीसी प्रवर्गीय व्यक्ती ही मनुस्मृती वाचूच शकणार नाही, इतकी तिरस्काराची भाषा या लोकांच्या म्हणजे शूद्र लोक आणि स्त्रियांच्या बाबतीत या मनुस्मृती ग्रंथात ठसठसून भरलेली आहे. खरच, मनुस्मृती ही एकदा वाचू तरी शकले तरी खूप मिळविली असे समजावे आणि त्यांना ब्राह्मणांनी कसे वागवावे याचे निर्देश समजले की ते कुणाला उच्च व नीच म्हणायचे? हे तेच ठरवितील. नीच मानसिकतेने पोखरलेले ब्राह्मण लोक जर मनुस्मृती ही राज्यघटना असावी असे म्हणतात, या वरुन इतक्या कुजलेल्या नीच मानसिकतेच्या लोकांच्या हातात आज या देशाची सर्व क्षेत्रातील सत्ता आहे. वरुन ते उच्च वर्णीय म्हणून उजळ माथ्याने मिरवितात. जर भारत देशाचे भवितव्य मनुस्मृतीच ठरवित असेल तर या देशातील ओबीसींसह समस्त मागास प्रवर्गीय लोक हे मानव नाहीत काय? आणि जर त्यांना मानव म्हणून मान्यताच नसेल तर या देशात उन्नाव, कठाऊ, हाथरस इ.सारख्या अत्याधिक क्रुरतेने वागविणा-या अमानविय घटना घडत असतांना जागतिक मानवतावादी संघटना व युनो हे काय हातावर हात देऊन बसण्यासाठी स्थापन करण्यात आल्या आहेत काय?

भारतात खुनशी प्रवृत्तीचे छटाकभर जेमतेम असलेले नीच ब्राह्मण लोक हे उच्च वर्णीय संबोधत उजळ माथ्याने बहुजन व बहुसंख्य असलेल्या लोकांवर अन्याय, अत्याचार, बलात्कार व खून पाडत मोकळे फिरत असतील आणि त्यांच्या विरोधात सरकार व समस्त संवैधानिक स्तंभ हे काहीच कारवाई न करता गुमान कसे काय बसले आहेत? भारतात मनुस्मृती ही लागू झाली काय? याचा शोध आणि बोध भारत देशात राहणाऱ्या ओबीसींसह बहुजनांनी जरुर घ्यावा आणि भारतीय संविधान- जे २६ जानेवारी १९५० ला लागू झाले आहे त्याचा प्रभाव कितपत टिकून आहे? याचा शोध घ्यावा. जय संविधान म्हटल्याने काही संविधान कार्यरत राहणार नाही. त्यासाठी सचोटीने भारतातील बलुतेदार असलेल्या ओबीसींसह बहुजनांनी सशक्त एकजूटीतून मनुवाद्यांचे मनसुबे परास्त करण्यासाठी जवाबदारीने व त्यागाने कामाला लागावे. कारण, "मरता क्या नहीं करता?" असे जर खरे असेल तर ओबीसींसह बहुजन लोक वाट कोणाची बघत गुमान बसले आहेत?

तथागत गौतम बुध्द, म. बसवेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, म. फुले, सावित्रीमाई फुले, छ.शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रामासामी प्रेरियार, प्रबोधनकारी संत गाडगे बाबा इ. महामानव हे पुन्हा भारतात जन्म घेतील? असा जर समज भारतातील ओबीसींसह तमाम बहुजनांचा असेल तर, हा भ्रम त्वरित आपल्या समजीतून काढून फेकावा. नाही तर मनुस्मृतीने घालून दिलेले निर्देश गुमान सहन करण्याची तयारी ठेवावी. भारतातील ओबीसींसह तमाम बहुजन हे मानव असतील तर प्रतिकार जरूर करतील. ते कोण आहेत? मानव कि काय? हे त्यांनीच स्वतः आता ठरवावे? धोक्याचा जोरदार घंटानाद घणघण करीत कानठळ्या बसवित सुरू झालेला आहे. बहिरे सुध्दा जागतील. कुंभकर्ण सुध्दा झोपेतून उठेल. बहुजनांतील विद्यमान शंबूक, एकलव्य, कर्ण इ. केव्हा खडबडून जागे होतील? तगायचे, जगायचे कि खितपत आपले मरण आपल्या उघाड्या डोळ्यांनी पाहायचे? हे ठरविण्याची जवाबदारी ही आता या ८५ टक्के असलेल्या बलुतेदार-ओबीसींसह तमाम बहुजनांची आहे. नीच मनुवाद्यांचा धिक्कार करीत बहुजनांनी जसा जमेल तसा प्रतिकार करावा आणि आपले डुबते भारतीय संविधानरूपी विशाल जहाज हे मनुस्मृतीरुपी डोंग्यांच्या जोराचा धक्का हळूवार दिलेल्या धक्क्यातून वाचविण्याची जवाबदारी पुढे होऊन घ्यावी. शेवटी ही जवाबदारी कुणाची? पराभूत मानसिकतेतून बाहेर पडून व नसलेले आपसी मतभेद विसरून आता संघटीत होत बहुजनांनी प्रतिकारासाठी सज्ज व्हावे. "अभी नहीं तो कभी नहीं" हे कायमचे लक्षात घ्यावे.कारण प्रत्येक क्षेत्रात मनुस्मृतीचे हंटर मारणे सुरू झालेले आहे. मनुस्मृतीचे यांत्रिकिकरण झाल्यामुळे ती आता बुलडोझरी झाली आहे. बुलडोझरचे धक्के परतावून ते परास्त करण्याची जवाबदारी ही आता आपली आहे, नव्याने जन्म घेणा-या फुले-शाहू-आंबेडकरांची नव्हे.

**- विनोद उलीपवार.**

# महसुल कर्मचाऱ्यांनी सरकारविरोधात केली निदर्शने,रिक्त पदे भरण्याची मागणी




**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेने पुकारलेल्या राज्यस्तरीय आंदोलनाच्या अनुषंगाने आज आंदोलनाचा तिसरा टप्पा म्हणून गोंदिया जिल्ह्यातील संपूर्ण महसूल कर्मचारी वर्ग-३ व वर्ग-४ तसेच पदोन्नत नायब तहसीलदार हे आज २८ मार्च २०२२ च्या एक दिवसीय लाक्षणिक संपात सहभागी झाल्याने नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागले.या आंदोलनामुळे जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात शुकशुकाट दिसून येत आहे. महसूल कर्मचारी संघटनेच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुर्वी २१ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालय, उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने दुपारच्या जेवणानंतर निदर्शने करुन सरकारचे लक्ष वेधण्यात आले होते. त्याशिवाय २३ मार्च रोजी काळ्या फिती लावून काम केले होते आज २८ मार्च रोजी तिसर्या टप्यात एकदिवसीय आंदोलन करण्यात येत आहे. सरकारने यानंतरही मागण्या पूर्ण केल्या नाही तर ४ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा महसूल कर्मचारी संघटनेने दिला आहे. यात नायब तहसीलदारांची रिक्तपदे तातडीने भरण्यात यावीत, तसेच अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांची पदोन्नती करण्यात यावी, रिक्तपदे तातडीने भरावीत .अव्वल कारकून व मंडळ अधिकाऱ्यांना नायब तहसीलदारपदी पदोन्नती देण्यात यावी, अशी शिफारस करणारे पत्र व यादी विभागीय आयुक्त कार्यालयाकडून शासनाला पाठविण्यात आली आहे, परंतु यास शासन स्तरावर मान्यता न मिळाल्यामुळे पदोन्नतीचे हे काम रखडले आहे. शिवाय नायब तहसीलदारच्या रिक्तपदाचा कार्यभार इतरत्र कार्यरत असणा?्या नायब तहसीलदार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे एका नायब तहसीलदारकडे दोन ते तीन विभागांचे पदभार आहेत. परिणामी, कामे प्रलंबित राहून जनतेच्या रोषास नाहक सामोरे जावे लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

या आंदोलनात लिलाधर पाथोडे,आशिष रामटेके,राकेश डोंगरे,नायब तहसिलदार नागपूरे, अतुल कडू, मुकुंद एम तिवारी, मोहसीन खान,वासुदेव लुचे, सुपचंद लिल्हारे, महेश कांचनवार,विठ्टल राठोड, पवन बिसेन, एन.के.पराते, चैताली मानकर, सोनाली भोयर, संतोष नान्हे, कांता साखरे, रुपचंद नाकाडे, सुरेंद्र भजनकर, आर.बी.भाजीपाले यांच्यासह इतर कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते.

# शिक्षक ते पाठ्यपुस्तक लेखक

मनमिळाऊ, उपक्रमशील शिक्षक म्हणून परिचित असलेले मच्छिंद्र ऐनापुरे यांचा शिक्षक ते पाठ्यपुस्तक लेखक असा प्रवास थक्क करणारा आहे. अत्यंत खडतर परिस्थितीतून शिक्षण घेऊन त्यांनी डी.एड.पूर्ण करून जत तालुक्यातच शिक्षकी पेशा स्वीकारला. त्यांच्या विद्यार्थी सेवेची सुरुवात जून १९९५ मध्ये उंटवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतून झाली. सुंदर अक्षरांची देणगी लाभलेल्या ऐनापुरे यांनी तिथल्या शाळेच्या भिंती बोलक्या करून टाकल्या. अभ्यासक्रमाबरोबरच मुलांना गोष्टींमध्ये रमवुन त्यांना अवांतर वाचनाची गोडी लावली. त्यांचा तिथल्या रोजच्या परिपाठाचा फलक लिहिण्याचा शिरस्ता होता. क्रीडास्पर्धा, वक्तृत्व, भाषण, सांस्कृतिक स्पर्धांमध्ये आणि शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये अगदी जिल्हा स्तरापर्यंत मुले त्यांच्या प्रयत्नाने चमकली. त्यांच्या तिथल्या बारा वर्षांच्या कारकिर्दीत आदर्श ग्रामीण शाळा, स्वच्छ सुंदर शाळा यासह अनेक पुरस्कार पटकावले. लोकवर्गणीतून शाळेचे बाह्यरूप बदलून टाकले.

जत शहरातील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा क्रमांक ३ ही शाळादेखील त्यांनी २००९ मध्ये सर्वांगीण गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत स्पर्धेत जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर आणून पारितोषिक खेचून आणले. शाळा परिसरात जी हिरवीगार झाडं आहेत ती श्री. ऐनापुरे यांच्या प्रयत्नांचा परिपाक आहे. मुलांचे अक्षर लेखन सुधारावे म्हणून त्यांनी जाईल त्या शाळेत अक्षर सुधार प्रकल्प राबवला आहे. शिष्यवृत्ती आणि विविध स्पर्धांमध्ये मुले चमकावीत यासाठी त्यांचे सतत प्रयत्न राहिले आहेत. शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेतही त्यांनी आपला सहभाग नोंदवून पारितोषिके पटकावली आहेत. गेल्या पंचवीस-सव्वीस वर्षात त्यांची उंटवाडी, जत क्र.३, अमृतवाडी, लमाणतांडा (निगडी बुद्रुक) येथील शाळांमध्ये सेवा झाली आहे.सध्या ते एकुंडी येथील शाळेत पात्र पदवीधर म्हणून कार्यरत आहेत.

एकीकडे शाळांमध्ये विद्यार्थी व शाळेची गुणवत्ता वाढवण्याचा ध्यास सुरू असताना त्यांनी बालकथा व समाज सुधारणासंबंधी विविध लेखनाचा छंदही जोपासला आहे. आतापर्यंत त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत तर आणखी तीन पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. यात व्यक्तिचित्रे, बालकथा आणि हास्यकथा, संपादकीय लेख, प्रेरणादायी लेखसंग्रह यांचा समावेश आहे. त्याचबरोबर किशोर, मुलांचे मासिक, केसरी-छावा, दैनिक दिव्यमराठीमधील किड्स कॉर्नरमध्ये त्यांचे सातत्याने लिखाण सुरू आहे. जवळपास ते वीस-पंचवीस वर्षांपासून लिखाण सुरू आहे. गेल्या बारा वर्षांपासून ते ब्लॉग लेखन करीत आहेत. त्यात सुमारे दोन हजारांहून अधिक लेख वाचकांसाठी उपलब्ध आहेत.



त्यांनी लिहिलेले 'धाडसी कॅप्टन: राधिका मेनन' हे व्यक्तिचित्रण बालभारती आठवीच्या पाठ्यपुस्तकात समावेशीत असून गेल्या पाच वर्षांपासून हा पाठ मुलांना अभ्यासाला उपलब्ध आहे. पाठ्यपुस्तकात समावेशीत झालेले ते जत तालुक्यातील पहिले लेखक आहेत. त्यामुळे जत तालुक्याला त्यांचा सार्थ अभिमान आहे. मराठी साहित्य सेवा मंचच्या माध्यमातून त्यांची अन्य साहित्यिक मित्रांच्या सोबतीने जत तालुक्यात साहित्य चळवळ सुरू आहे. साहित्य संमेलने, कथा-काव्यलेखन कार्यशाळा, कवी संमेलने, पुस्तक प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन अशी अनेक उपक्रमे जत तालुक्यात राबवली जातात.

**ग्रंथसंपदा आणि ब्लॉग**

गेली वीस-पंचवीस वर्षे महाराष्ट्रातल्या आघाडीच्या वृत्तपत्रांबरोबरच स्थानिक वृत्तपत्रांमध्ये श्री. मच्छिंद्र ऐनापुरे सर विविधांगी, विविध विषयांवर लेखन करीत आहेत. लोकसत्ता, पुढारी, सकाळ, गावकरी, सामना, तरुण भारत, संचार, केसरी, पुण्यनगरी, महासत्ता, लोकमत या दैनिकांबरोबरच माणदेश नगरी, संकेत टाइम्स, नवा महाराष्ट्र आदी स्थानिक दैनिकांमध्ये सातत्याने लेखन प्रसिद्ध होत आहे. किशोर, मुलांचे मासिक, केसरीचा छावा, छोट्यांचा छोटू या मुलांच्या मासिकांमध्येही ते आवर्जून लिहित आहेत. 'जंगल एक्सप्रेस' (बालकथासंग्रह), हसत जगावे (विनोदी कथासंग्रह), सामान्यातील असामान्य (व्यक्तिचित्रे), गोष्टी स्मार्ट बालचमूच्या, माकडाचा पराक्रम (बालकथासंग्रह), रहस्यमय अंगठी, असेही एक रहस्य (रहस्यकथा संग्रह) अशी पुस्तके प्रसिद्ध आहेत. याशिवाय मविचारांच्या प्रदेशातफ (लेखसंग्रह), यशाचा मूलमंत्र (प्रेरणादायी लेखसंग्रह) आणि 'देव आले दारी' (बालकथा संग्रह) प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांच्या मच्छिंद्र ऐनापुरे या नावाने असलेल्या ब्लॉगवर सुमारे दोन हजारांहून लेख प्रसिध्द आहेत. आजच्या विद्यार्थ्यांना आणि युवकांना डोळ्यांसमोर ठेवून, त्यांना प्रेरणा मिळावी, यासाठी खास करून लेखन केलं आहे. आज तरुण पिढी बहकत चालली आहे, याची खरे तर चिंता सतावत आहे. या युवकांना, किशोरवयीन मुलांना योग्य मार्गदर्शन होण्याची गरज आहे. आज नोकऱ्या नाहीत, उद्योगधंदे-व्यवसाय करण्याचे मार्गदर्शन नाही. त्यातच आपल्या महाराष्ट्रातल्या युवकांना उद्योग, व्यवसायाचे वावडे आहे. त्यामुळे आजची शिक्षित पिढीदेखील काळजीत आहे.

या युवकांमध्ये काही तरी करण्याची धमक निर्माण होण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यात एकाग्रता, जिद्द, मेहनत, चिकाटी, सातत्य, झपाटलेपणा ही गुणवैशिष्ट्ये उतरल्याशिवाय त्यांना यश मिळणार नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडायला हवे. तरच त्यांचा विकास शक्य आहे. आवडीच्या क्षेत्रात ते मोठी भरारी घेऊ शकतात. मग तो व्यवसाय, उद्योग असेल अथवा नोकरी, समाजकार्य असेल. ज्यात जीव रमतो,त्याला प्राधान्य दिल्यास यश तर मिळेलच पण त्याचा जीवही त्यात चांगला रमेल. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे एक चांगला, भला माणूस म्हणून आपली ओळख निर्माण व्हावी, असा विचार युवकांनी करायला हवा. या जगात, देशात, महाराष्ट्रात नव्हे आपल्या आजूबाजूला अशी माणसे आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी आणि आपले आयुष्य युवकांनी घडवावे, असे वाटल्याने श्री. ऐनापुरे यांनी अशा आपल्या स्वकर्तृत्वातून यशस्वी झालेल्या लोकांविषयी लिहिण्याचे काम हाती घेतले. यातली व्यक्तीचित्रे स्थानिक वृत्तपत्रांबरोबरच मार्मिक (साप्ताहिक), किशोर (मासिक) मध्ये प्रसिद्ध झाली आहेत. किशोरमध्ये प्रसिद्ध झालेले धाडसी कॅप्टन: राधिका मेनन हे व्यक्तिचित्रे २०१८ च्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व संशोधन मंडळाने आठवीच्या बालभारतीच्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे. ही चरित्रे प्रेरणादायी आहेत. मुलांना, युवकांना विचार करायला लावणारी आहेत. त्यामुळे ही व्यक्तिचित्रे पुस्तक स्वरुपात आणली आहेत.

**दिलीप मारोती वाघमारे**
**जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा बाबरवस्ती ( पांडोझरी)**
**तालुका जत जिल्हा सांगली**
**९८८११४२११३**

# शासकीय डॉक्टरांची खासगी प्रॅक्टिस




## शासकीय रुग्णालयांतील प्रशासन रामभरोसे,सीएसचे पत्र बिनकामी

**गोंदिया:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व गंगाबाई महिला रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांची नियमांना डावलून बेधडक खासगी प्रॅक्टिस सुरू आहे. हा नियमबाह्य प्रकार वरिष्ठांना ज्ञात असूनही त्यावर पडदा टाकण्यात येत आहे. याचा थेट परिणाम रुग्णसेवेवर पडत असून, डॉक्टरच उपलब्ध नसल्याची ओरड शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडून होते. नियमानुसार शासकीय सेवेत कार्यरत डॉक्टरांना खासगी प्रॅक्टिस करता येत नाही. सेवेत रुजू होण्यापूर्वी तसे बॉन्ड पेपरवर लिहूनही घेण्यात येते; मात्र हे नियम केवळ कागदोपत्रीच ठरत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नियमित, ज्युनिअर रेसिडेन्स डॉक्टर आणि बंधपत्रित डॉक्टर व प्राध्यापक कार्यरत आहेत. यातील अनेक डॉक्टर आणि बंधपत्रित डॉक्टरांची नियमबाह्य खासगी प्रॅक्टिस सुरू आहे. या डॉक्टरांचे स्वत:चे दवखाने आहेत. शिवाय, शहरातील मोठ्या खासगी रुग्णालयाच्या यादीतही त्या डॉक्टरांच्या नावाचा समावेश आहे. हा प्रकार उघडपणे सुरू असला, तरी कोणी तक्रार करत नसल्याने त्यांच्यावर कारवाई करता येत नसल्याचे वरिष्ठांकडून सांगण्यात येते; परंतु डॉक्टरांचा हा प्रकार थेट रुग्णसेवेला प्रभावित करत आहे. खासगी प्रॅक्टिसमध्ये व्यस्त असणाऱ्या डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णांवर उपचार होत नाही. हा प्रकार अनेकांच्या जीवावर बेतणारा ठरत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अनेक डॉक्टर नागपूरवरुन ये-जा करतात. यावर आळा घालण्याकरिता बायोमेट्रीक

### प्रशिक्षणार्थी डॉक्टरांच्या हाती कारभार

**खासगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांचा बहुतांश वेळ खासगी रुग्णालये किंवा स्वत:च्या दवाखान्यात जातो. त्यामुळे केटीएस, गंगाबाई रुग्णालयातील रुग्णसेवेचा भार प्रशिक्षणाथी डॉक्टरांवर येत आहे. हा प्रकार रुग्णांच्या जीवावर बेतणारा आहे.**

### सरकारीतील रुग्ण खासगीत रेफर

**शासकीय रुग्णालयात जिल्ह्यातील दुर्गम भागातील रुग्ण मोफत आणि शास्वत उपचार मिळेल या अपेक्षेने जिल्हा मुख्यालयी असलेल्या रुग्णालयात येतात. परंतु, त्या रुग्णांच्या सेवा सुश्रूशेकडे दुर्लक्ष करण्यात येते. रुग्ण शेवटी कंटाळतो. त्या रुग्णांना याच रुग्णालयात असलेल्या डॉक्टरांचे दलाल भेटून त्या डॉक्टरांच्या खासगी रुग्णालयात भरती होण्याचा सल्ला देतात. नाईलाज असल्याने त्या रुग्णांना खासगी रुग्णालयात जावून उपचार घ्यावा लागतो.**

हजेरीची व्यवस्था करण्यात आली. परंतु, त्याला सुद्धा येथील कर्मचारी भीक देत नसल्याची गंभीर बाब उघडकीस आली. त्याचप्रकारे बाह्यरुग्ण विभागात अस्थीरोग, मेडिसीन, सर्जरी, मानसीक आजार, दन्त विभाग, नेत्र शस्त्रक्रीया विभाग, कान-नाक-गळा विशेषज्ञ, युनानी औषधी, आयुर्वेदिक, जनरल फिजिशीयन विभागाच्या प्रमुखांचे नामफलक लावण्यात आलेले नाही. त्यामुळे रुग्णांना इकडून तिकडे भटकंती करावी लागते. कोणत्या कामाकरिता किती पैसे हे दरपत्रक देखील येथे लावण्यात आले नाही. परिणामी मर्जीनुसार पैसे उकळून मर्जीनुसार रक्कम शासकीय अधीकोषात जमा करण्यात येते. अस्थिरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र, कान-नाक-घसा, सर्जरी, मेडीसीन, दंतरोग या महत्वाच्या असलेल्या विभागांतील डॉक्टरांनी शासकीय वेतन उचलून देखील आपली दुकानदारी थाटली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी जिल्हा शल्य चिकित्सक आणि

### उपकरण साहित्याची कमतरता

**केटीएस रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिनस्त आहे. गेल्या काही काळापासून या रुग्णालयातील अस्थिरोग विभागात शस्त्रक्रीयेकरिता असलेले उपकरण आणि त्यानंतर लागणाऱ्या साहित्याची कमतरता हा विषय गंभीर झाला आहे. फ्रॅक्चर बँडेज, कापूस, केक बँडेज, क्रॅक बँडेज, स्टील रॉड, लोखंडी रॉड आदींची कम तरता हा नित्याचा विषय झाला. अनेकदा एक्स रे फिल्मची कम तरता, सीबीसी तपासणीकरिता लागणारी मशीन यासह इतर साहित्याची कमतरता भासते.**

वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी पत्र काढून कारवाई करण्याचा इशारा दिला होता. मात्र तो केवळ फार्स होता. अद्यापही दुकानदारी सुरूच असून यावर आळा घालण्यात यावा, अशी मागणी जोर धरूलागली आहे.

# नवेगावबांध होणार "पुस्तकांचे गाव"




प्रायोगिक तत्वावर विभागातून पहिले गाव, वाचकांना सुवर्णसंधी

**गोंदिया:** "वाचाल, तर वाचाल' असे म्हटले जाते. वाचनातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या जातात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांना देखील अभ्यासाचा मोठा लाभ होतो. त्याकरिता राज्य शासनाने "पुस्तकांचे गाव' हा उपक्रम सुरू केला असून प्रत्येक जिल्ह्यात एक गाव पुस्तकांचे असणार आहे. प्रायोगिक तत्वावर सहा विभागांत प्रत्येकी एका गावाची निवड करण्यात आली असून त्यात राष्ट्रीय उद्यान असलेल्या नवेगावबांध गावाची त्यात निवड झाली आहे. त्यामुळे पक्ष्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या नवेगावबांधच्या शिरपेचात पुन्हा मानाचा तुरा रोवला गेला आहे.

वाचनातून मणुष्य प्रगल्भ होतो. त्याच्या ज्ञानात भर पडते. शिवाय जगण्याची आणि विचार करण्याची शैली देखील सुधारते. वाचनाचा व्यासंग वाढून विचार करण्याची ताकद निर्माण व्हावी, या उद्देशाने राज्य शासनाने पुस्तकाचे गाव ही संकल्पना रुजविण्याचा निर्णय घेतला. या योजनेची व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीने तसेच मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात एक पुस्तकाचे गाव सुरू करून योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या ४ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयानुसार पुस्तकांचे गाव ही योजना विस्तारीत स्वरुपात सुरू करताना पहिल्या टप्प्यात पुस्तकांचे गाव विभागीय स्तरावर सहा महसुली विभागांत सुरू करण्यात येणार आहेत. राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाला मंर्त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवण्यात आले होते. समितीच्या निर्णयानुसार सहा महसूली विभागातील गावांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यात औरंगाबाद विभागातून वेरूळ, नागपूर विभागातून नवेगावबांध, कोकण विभागातून पोंभूर्ले आणि पुणे विभागातून अंकलखोप या गावांची निवड करण्यात आली. पहिल्या टप्प्यात मंजुरी देण्यात आलेल्या गावांमध्ये गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांधचा समावेश असल्यात आल्यामुळे साहित्यप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आत्तापर्यंत व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यान आणि स्थलांतरीत पक्षांसाठी प्रसिद्ध असलेले नवेगावबांध आता पुस्तकांचे गाव म्हणून नावारुपास येणार असल्याने या गावाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. नवेगावबांध येथे पुस्तकांचे गाव मंजूर व्हावे याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन समिती, ग्राम पंचायत आणि नवेगावबांध फाउंडेशनने पुढाकार घेतला होता.

# १२० गावांतील पाण्यात नत्राचे प्रमाण अधिक

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागातर्फे नुकतेच जिल्ह्यातील गावांतील पाण्याच्या स्त्रोतांची पाहणी करण्यात आली. त्यातून धक्कादायक माहिती पुढे आली असून १२० ग्राम पंचायतींतर्गत येणाऱ्या गावांतील पाणी पिण्यायोग्य नसल्याचा खुलासा झाला आहे. त्या गावांतील पाण्यात नायट्रेटचे प्रमाण अधिक आढळले असून युरियाच्या अधिक फवारणीमुळे हा परिणाम झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जिपच्या पाणी व स्वच्छता विभागातर्फे पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर जिल्ह्यातील काही गावांची




| तालुका | एकुण जलस्त्रोत | दुषित जलस्त्रोत |
|---|---|---|
| गोंदिया | ३१६८ | ४२ |
| तिरोडा | १८९३ | ८ |
| गोरेगाव | १६९२ | १९ |
| आमगाव | १७७४ | ९ |
| देवरी | १५१९ | ९ |
| सालेकसा | १४४८ | २९ |
| अर्जुनी-मोरगाव | १५५७ | ४ |

निवड करुन तेथील पाण्याचे नमुने घेण्यात येतात. त्या नमुन्यांचे परिक्षण करुन पाणी पिण्यायोग्य आहे, की नाही याची चाचपणी करण्यात येते. जिल्ह्यात एकुण १४ हजार ३५५ जलस्त्रोत आहेत.

त्यातील २ हजार ९४७ जलस्त्रोतांची तपासणी केली. त्या पाहणीत १२० ग्रापंच्या हद्दीत येणाऱ्या जलस्त्रोत दुषित असल्याचे आढळून आले. या गावातील पाण्यात नायट्रेटची मात्रा अधिक प्रमाणात आढळली. खरीप आणि रबी हंगामात फवारणीकरिता युरीया खताचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येतो. ते मात्र जमिनीत मुरुन पाण्यात मिसळत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शेतातील नायट्रेट मिश्रीत पाणी वाहत जाऊन जलस्त्रोतांत मिसळत असल्याने त्याचा परिणाम पिण्याच्या पाण्यावर होतो.

# गोंदिया येथे खासदार औद्योगिक महोत्सव घेण्याचा मानस

**भंडारा:** लहान-मोठ्या उद्योगांच्या माध्यमातून तरुणांना त्यांच्या पायावर उभे करण्याच्या दृष्टीने तसेच समूह उद्योगाची संकल्पना वाढीस यावी या हेतूने आज खासदार सुनील मेंढे यांनी नागपूर येथे मध्यम, सूक्ष्म व लघु उद्योग उपक्रमाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत विस्तृत चर्चा केली. भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील तरुणांसाठी काय करता येईल यावर मंथन करण्यात आले.



मध्यम, सूक्ष्म व लघु उपक्रम आणि खादी ग्रामोद्योग च्या अधिकाऱ्यांना घेऊन झालेल्या बैठकीत रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाची चर्चा केली गेली. भंडारा गोंदिया जिल्ह्यात छोटे-मोठे उद्योग उभारून रोजगार निर्मिती कशी करता येईल याची साधक-बाधक चर्चा झाली. समूह उद्योग ही संकल्पना पुढे आल्यास अनेक बेरोजगार स्वयंभू होऊ शकतात. त्यासाठी अधिकाऱ्यांनी भंडारा गोंदिया जिल्ह्याचा विचार करता भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीला अनुरूप असे उद्योग सुचवावेत अशा सूचना खासदार सुनील मेंढे यांनी केल्या.

याच बैठकीत आगामी काळात गोंदिया येथे खासदार औद्योगिक महोत्सव घेण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला. लवकरच हा महोत्सव घेण्यात येणार असून या महोत्सवाच्या माध्यमातून तरुणांना उद्योगाच्या संधी उपलब्ध होतील या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचनाही खासदारांनी केल्या. औद्योगिक महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात काही महत्त्वपूर्ण विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

या बैठकीला मध्यम, सूक्ष्म व लघु उद्योग उपक्रमाचे सहाय्यक संचालक राहुल मिश्रा, भाजप विदर्भ उद्योग आघाडी संयोजक गिरधारी मंत्री, भंडारा जिल्हा उद्योग आघाडी संयोजक तुषार काळबांधे, गोंदिया जिल्हा किसान आघाडी जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, युवा मोर्चा महामंत्री हर्ष मोदी, अनुप ढोके, मनीष कापगते, अक्षय निमकर, अक्षय गिरडकर, पवन कटनकर व आदी उपस्थित होते.

## प्रा.आ.केंद्र चान्ना येथे रुग्णांना फळ वाटप

**अर्जुनी मोर. :-** राज्याचे माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री राजकुमार बडोले यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून बोंडगावदेवी क्षेत्राचे जिल्हा परिषद सदस्य तथा गोंदिया जिल्हा परिषदेचे गटनेते तथा भाजपाचे जिल्हा महामंत्री लायकराम भेंडारकर यांचे विशेष मार्गदर्शनात प्रा. आ.केंद्र चान्ना येथील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

# धानाचे चुकारे ३० मार्चपर्यंत मिळणार

**अर्जुनी मोरगाव :** खरीप हंगामाचे चुकारे देण्यात आले नाही. या प्रकाराला कंटाळून शेतकऱ्यांनी आदिवासी विकास महामंडळाविरूद्ध उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेत आ.चंद्रिकापुरे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेवून महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यातच ३० मार्चपर्यंत चुकारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आश्वासन देण्यात आल्यामुळे उपोषण तुर्त मागे घेण्यात आले.



धान खरेदीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करावी, धानाचे चुकारे त्वरित देण्यात यावे व पीक कर्ज भरण्यास शेतकऱ्यांना मुदतवाढ देण्यात यावी या मागणीला घेवून नवेगावबांध येथील आदिवासी विकास उपप्रादेशिक कार्यालयासमोर शेतकरी आमरण उपोषणाला बसले होते.

या उपोषणाची दखल घेत आ. मनोहर चंद्रिकापुरे यांनी आज (ता.२७) उपोषणकर्त्यांची भेट घेतली. दरम्यान महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता ३० मार्चपर्यंत धानाचे चुकारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार, असे आश्वासन देण्यात आले. यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी आ. चंद्रिकापुरे यांनी उपोषणकर्त्या शेतकऱ्यांना लिंबूपाणी पाजून उपोषणाची सांगता केली.

## ग्रामीण डाक सेवक डाक कर्मचारी संपावर

**आमगाव:-** ऑल इंडिया पोस्टल एम्प्लॉईज युनियन व नॅशनल युनियन ऑफ पोस्टल एम्प्लॉई वर्ग ३ व पोस्टमन, एम.टी.एस.च्या संयुक्त कृती समितीच्या वतीने विविध मागण्यांच्या अनुषंगाने २८ व २९ मार्च दोन दिवसीय देशव्यापी लाक्षणिक संप पुकारला आहे.

यातंर्गत तालुक्यातील डाक सेवक व डाक विभागीय कर्मचाऱ्यांनी संप पुकारुन केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा निषेध नोंदवला. जुनी पेन्शन योजना लागू करावी, फ्रेन्चाएझी आउटलेट व डाकमित्र योजना रद्द कावी, टपाल खात्यातील खाजगीकरणाचे धोरण थांबवावे, ट्रेड युनियनवरील हल्ले थांबवावे, युनियन पदावर राहण्यासाठी दोन टर्मची घातलेली अट रद्द करावी, वैद्यकीय विमा, नोडल डिलीव्हरी सेंटर बंद करावे, कोविडमुळे मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला १० लाख रुपये भरपाई व वारसाला अनुकंपा तत्त्वावर खात्यात नोकरी देण्यात यावी , रिक्त जागा त्वरित भराव्या, स्टाफ सिलेक्शन ऐवजी खातेनिय भरती प्रक्रिया पुन्हा सुरू करावी यासह २१ मागण्यांसाठी हा देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे.


**ग्रामपंचायत दिनकरनगर**
**पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया**
**निविदा सुचना**

निविदा क्र.१ जा.क्र.ग्रा.पं.दिनकरनगर/२०२२ दिनांक ३०/०३/२०२२

ग्रामपंचायत दिनकरनगर पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुंबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | १८४३५० /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०३/२०२२ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०६/०४/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय दिनकरनगर येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०३/२०२२ ते ०६/०४/२०२२ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय दिनकरनगर येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०७/०४/२०२२ ला ग्रामपंचायत दिनकरनगर येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

श्री.पी.एम.पवार
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत दिनकरनगर**

**सौ.सुचित्रा विनय शील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत दिनकरनगर**



**ग्रामपंचायत नवनितपूर**
**पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया**
**निविदा सुचना(दुसरी वेळ)**

निविदा क्र.२ जा.क्र.ग्रा.पं.नवनितपूर/२०२२ दिनांक ३०/०३/२०२२

ग्रामपंचायत नवनितपूर पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुंबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ८६८३८४/- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०३/२०२२ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०६/०४/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय नवनितपूर येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०३/२०२२ ते ०६/०४/२०२२ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय नवनितपूर येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०७/०४/२०२२ ला ग्रामपंचायत नवनितपूर येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

श्री.पी.एम.पवार
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत नवनितपूर**

**सौ.आशा दिनेश पालीवाल**
**सरपंच**
**ग्रामपंचायत नवनितपूर**


## बाजार समिती संघाच्या निवडणुकीत मानकर विजयी

**आमगाव:** महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघ पुणेच्या संचालक पदासाठी झालेल्या निवडणुकीत गोंदिया-भंडारा जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती आमगावचे सभापती केशवराव मानकर हे ६



विरुद्ध ३ अश्या मताधिक्क्याने विजयी झाले आहेत. त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पवनीचे संचालक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार लोमेश वैद्रैय यांचा पराभव केला. महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघ पुणेपु णेयेथे गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांमधूनधू एक संचालक निवडला जातो . गोंदिया जिल्ह्यामध्ये ७ तर भंडारा जिल्ह्यात ५ बाजार समित्या आहेत. प्रत्येक समितीमधून मतदान प्रतिनिधी निवडला जातो.

हे मतदान प्रतिनिधी बाजार समिती संघाचा संचा लक निवडतात. या निवडणुकीत गोंदिया जिल्ह्यातून ५ व भंडारा जिल्ह्यातून ४ मतदान प्रतिनिधींनी मतदानाचा हक्क बजावला.


**जाहिर निविदा सुचना (पहिली वेळ)**
**ग्रामपंचायत कार्यालय कोरंभी**
**पंचायत समिती अर्जुनी/मोर.**

जावक क्रमांक:-
दिनांक:-२१/०३/२०२२

ह्या सुचने द्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते कि मासिक सभा ठराव क्रमांक ६/१ दिनांक २४/०३/२०२२ अन्वये ग्रामपंचायत कोरंभी येथे २५१५-१२३८ अंतर्गत कोरंभी येथे जि.प. शाळा ते दुधराम लांजेवारच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकामाची कामे करणेकरिता दोन लिफाफा पद्धतीने अनुसूची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक ३०/०३/२०२२ ते दि.०६/०४/२०२२२ पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमूद केल्या प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीस च्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक ०६/०४/२०२२ ला दुपारी ठीक ०३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

सदर निविदा हि दिनांक ०७/०४/२०२२ ला (शक्य झाल्यास) मासीक सभेत सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजित किंमत | नमुना ७ निविदा फार्मची किंमत | निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम १% | निविदा स्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव २% | बिलातून कपात करण्यात येणारी सुरक्षा ठेव रक्कम२% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५१५-१२३८ अंतर्गत जि.प.ते दुधराम लांजेवारच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम | ७०००००/- | १०००/- | ७०००/- | १४०००/- | १४०००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोरंभी**

**सरपंच**
**ग्रामपंचायत कोरंभी**



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,क्रं.२**
**गोंदिया (दुरध्वनी क्र.०७१८२-२५००८४)**
**ई-निविदा सुचना क्रमांक २७/२०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, क्रं.२ गोंदिया हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक खात्याकडून खालील कामाकरीता विहीत ब-१ (टक्केवारी पद्धतीने) नमून्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.१ गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.लक्षात) | इसारा रक्कम (रू.लक्षात) | ई-निविदा फार्म किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जुनीमोर, येथील उपकोषागार कार्यालय येथे आधुनिकरणासह साहित्याचा पुरवठा करणे, जिल्हा गोंदिया | १३.०० | ०.१३ | ५६०.०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी:-** per e-tender Schedule uploaded on e-portal

**ई-निविदा उघडणे :-** ऑनलाईन नमुद केल्यानुसार वेळापत्रक रक्कम स्थळ इ.लागू व अंतिम राहील.

**टीप:-**

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील.

१.http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२.कार्यकारी अभियंता सां.बां.विभाग क्रं.२ गोंदिया कार्यालयातील सुचना फलक.
३. सदर निविदा सुचनेतील कामासंबंधित कोताही बदल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईडवरच प्रकाशित केल्या जाईल.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.२**
**गोंदिया**

क्र./जिमाला/गों/जाहि/३९/२०२२

# वीर महेंद्र अमर रहे अमर रहे!



**तिरोडा :** तालुक्यातील चिरेखनी येथील महेंद्र भास्कर पारधी हे भारतीय सैन्यात मराठा रेजिमेंटमध्ये मेजर (हवालदार) पदावर कार्यरत असताना अरूणाचल प्रदेश (डिब्रुगड) येथे बुधवारी पेट्रोलिंग दरम्यान हिम वृष्टीमुळे (दि. २३) शहीद झाले. या घटनेने अख्खा गोंदिया जिल्हा शोकसागरात बुडाला.

शहीद महेंद्र यांचे पार्थिव गुवाहाटी ते दिल्ली, दिल्ली ते नागपूर, नागपूर ते कामठी मुख्यालय व तिथून शुक्रवारी (दि. २५) तिरोडा तालुक्यातील बिरसी (फाटा) येथे दाखल झाले. यावेळी हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. "वीर महेंद्र अमर रहे" च्या जयघोषाने संपूर्ण परिसर निनादला होता. बिरसी येथेकाहीवेळ वीर महेंद्र यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. तेथे माजी सैनिकांच्यावतीने श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर दुचाकी रॅली व चारचाकी वाहनांच्या रांगेसह ही अंत्ययात्रा तिरोडा शहरातील सुकडी नाका येथे पोहोचली. तेथे उपस्थित जनसमुदायाने वीर महेंद्र यांना श्रद्धांजली अर्पण केली.

सुकडी नाका ते करिश्मा चौक ते महात्मा गांधी पुतळा ते राणी अवंतीबाई चौक ते सी.जे.पटेल कॉलेजपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा वीर महेंद्र यांचे अंत्यदर्शन घेण्याकरिता मोठ्या संख्येने महिला-पुरुष व विद्यार्थ्यांनी एकच गर्दी केली होती. ही वीर जवानाची अंत्ययात्रा पाहून सर्वांच्या हृदयात देशभक्ती संचारली होती. सर्वांनी ठिकठिकाणी श्रद्धांजली अर्पण केली. तिरोडा शहर व ग्राम चिरेखनी येथील व्यावसायिकांनी आपली प्रतिष्ठाने काही वेळासाठी बंद ठेवली होती. सर्वांना वीर महेंद्र यांचे अंत्यदर्शन घेण्याचा ध्यास लागला होता. सर्वत्र "वीर महेंद्र अमर रहे"चा जयघोष सुरू होता.

**शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

ग्राम चिरेखनीच्या प्रवेशद्वारातून ही अंत्ययात्रा वीर महेंद्र यांच्या घरी पोहोचली. तेथे आधीच हजारोंच्या संख्येने अंत्यदर्शनासाठी नागरिक उपस्थित होते. सैन्य दलाचे जवान व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. तेथे गावातील रितीरिवाजानुसार माल्यार्पण करून अंत्यदर्शन घेण्यात आले. त्यानंतर गाव प्रदक्षिणा घालण्यात आली व स्मशानभूमीकडे प्रस्थान झाले. तिरोडा व ग्राम चिरेखनी येथेन भूतो न भविष्यती अशी गर्दी झाली होती.

माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे, माजी आमदार दिलीप बन्सोड, माजी आमदार हेमंत पटले, माजी नगराध्यक्ष सोनाली देशपांडे, उपविभागीय अधिकारी पुजा गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे, तहसिलदार प्रशांत घोरुडे, पोलीस निरीक्षक योगेश पारधी, सरपंच शिलाबाई पारधी, जिल्हा सैनिक कल्याण संघटक जगदिश रंगारी, जिप सदस्य चत्रभुज बिसेन, जिप सदस्य पवन पटले, यांनी पुष्पचक्र अर्पण केले. जिल्हा पोलीस दलाने ३ फैरी झाडून मानवंदना दिली. सैन्यदलातर्फेही मानवंदना देण्यात आली. शहीद महेंद्र पारधी यांचा मोठा मुलगा जानव पारधी यांच्या हस्ते अग्नी देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी चिरेखनी गावातील तसेच तिरोडा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सामुहिक शोकसभा घेण्यात आली.

शहीद महेंद्र पारधी यांच्या पत्नीचे नाव गायत्री असून त्यांना जानव (वय १०) व शिवाय (वय ४) नावाची दोन मुले आहेत. शहीद महेंद्र पारधी यांचे वडील भास्कर पारधी यांचा काही वर्षापूर्वी मृत्यू झाला. आई चित्रकला पारधी हयात आहेत. महेंद्र यांना तीन भाऊ आहेत. मोठ्या भावाचे नाव चंद्रशेखर पारधी, दुसऱ्या क्रमांकाचे शहीद महेंद्र पारधी, तिसऱ्या क्रमांकाचे सोनू पारधी व चौथ्या क्रमांकाचे फनेंद्र पारधी अश्या चौघ्या भावंडाचे कुटूंब.



# अध्यक्ष,सभापती पदस्थापनेला मुहुर्त सापडेना;नवनिर्वाचित सदस्यांमध्ये पेच

**गोंदिया :** जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांचा निकाल लागून दोन महिन्यांचा कालावधी उलटला. परंतु, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापतिपदांची अद्याप निवड प्रक्रिया राबविण्यात आली नाही. त्यामुळे नवनिर्वाचित सदस्य चातकाप्रमाणे निवडीची वाट पाहात आहेत. एवढेच नव्हे, जिल्ह्यातील विकासकामांनाही खिळ बसली आहे.

जिल्ह्यातील ५३ जिल्हा परिषद आणि १०६ पंचायत समितीच्या निवडणुका दोन टप्प्यात घेण्यात आल्या. १९ जानेवारीला निकाल जाहीर करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या २६ जागा जिंकत भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला. सत्ता स्थापनेसाठी केवळ एका जागेची पूर्तता भाजपला करावी लागणार आहे. चावी संघटन किंवा निवडून आलेल्या अपक्ष उमेदवारांच्या माध्यमातून ही पूर्तता होणार आहे. परंतु,



निकाल जाहीर होऊन तब्बल दोन महिन्यांचा कालावधी लोटला तरी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया राबविण्यात आली नाही. पदाधिकाऱ्यांच्या निवडीची अधिसूचना कुठे रखडली, हा पेच आहे. त्यामुळे नवनिर्वाचित सदस्य हातावर हात मांडून आहेत. निवडून आले असले, तरी त्यांना आपल्या मतदारसंघात विकासात्मक कामे करता येत नाहीत. हजारो वनहक्क पट्टे प्रलंबित असल्याचे बोलले जाते.

प्रशासकीय अधिकारी यावर कुठलीही कार्यवाही करताना दिसत नाहीत. विविध योजनांचे लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित आहेत. सध्या मार्च एंडींगच्या नावावर प्रशासनाचा मनमजी कारभार चालत आहे. ग्रामीण क्षेत्रातील विकासकामांचा अक्षरशः खेळखंडोबा होत आहे. तथापि, जिल्ह्याच्या विकासाची गाडी पुढे रेटण्यासाठी नवनिर्वाचित सदस्यांच्या हाती लवकर स्टिअरिंग येणे गरजेचे आहे.

## गावागावांतही रंगू लागल्या चर्चा

**जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांचा निकाल लागून दोन महिन्यांचा कालावधी झाला. मात्र, अजूनही सदस्यांची पदस्थापना झाली नाही. हे सदस्य पदस्थापनेसाठी आतूर झाले आहेत. असे असताना आता निवडून आलेले सदस्य कधी कामाला लागतील, अशा चर्चा आता शहरापुरत्याच मर्यादीत राहिल्या नाहीत, तर गावागावांतही होत आहेत.**

# ओबीसी संघर्ष समितीने पाठविले मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जिल्हा परिषद व पंचायत समितीत पदस्थापना त्वरित करण्यात यावी, या मागणीचे निवेदन ओबीसी संघर्ष कृती समितीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांसह ग्रामविकास मंत्र्यांना पाठविले आहे. लोकप्रतिनिधीअभावी सर्वसामान्यांना प्रचंड समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. समान तारखांना निवडणुका होऊन नगर पंचायतीमध्ये पदाधिकाऱ्यांची निवड झाली आहे. मात्र, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या बाबतीत ग्रामविकास मंत्रालय अडवणुकीची भूमिका का घेत आहे?, राज्य सरकार आणि ग्रामविकास मंत्रालयाने या संदर्भातील भूमिका काय ते कळवावी, याबाबतची भूमिका स्पष्ट न झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असे संघर्ष समितीने निवेदनात नमूद केले आहे.**

**निवेदन देताना जिल्हा परिषद सदस्य कु.आनंदा वाढीवा, विमल कटरे, पंचायत समिती सदस्य मुनेश रहांगडाले, ओबीसी संघर्ष समितीचे बबलू कटरे, उद्धव मेहेंदळे,खेमेंद्र कटरे अमर वराडे, रत्नदीप दहीवले, जितेंद्र कटरे, निपल बरैय्या उपस्थित होते.**



# शेतकऱ्याची मुलगी झाली पीएसआय; एमपीएससी परीक्षेत प्रितीची गगण भरारी



**गोंदिया:** परिस्थितीही कितीही विपरित असली तरी अफाट जिद्द, काटेकोर नियोजन, व्यवस्थित व्यवस्थापन व दृढनिश्चय असला की यश हमखास मिळते.ते मग ते कोणतेही ते क्षेत्र असो. याच बळावर आता स्पर्धापरीक्षांमध्ये शहरी विद्यार्थ्यांच्या सोबतच ग्रामीण भागातील अगदी शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी यश संपादन करत आहेत. शहराजवळील कुडवा येथील चहा विक्रेता तथा अत्यल्पभूधारक शेतकरी कन्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत नेत्रदीपक यश मिळविले. प्रीती सुरेश पटले असे तिचे नाव.

प्रीती पटले या शेतकरी कन्येने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने सन २०१९ मध्ये पोलिस उपनिरीक्षक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत २१६ गुण मिळवत ओबीसी प्रवर्गातून राज्यात १७ वा क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून या प्रीतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रीती पटलेचे वडील सुरेश व आई गीता पटले अल्पभूधारक शेतकरी दांपत्य आहे. वडीलांचे शिक्षण सातवी तर आईचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. दीड एकर शेतीतून कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने त्यांनी शहराजवळच तिरोडा मार्गावर चहाचे दुकान लावले आहे. प्रीतीला लहानपणापासूनच अभ्यासामध्ये हुशार व जिद्दी आहे. तिचे प्राथमिक शिक्षण कुडवा येथे तर माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण गोंदिया येथे झाले.

पदवी व पदव्युत्युतर शिक्षण त्यांनी खाजगी नोकरी करून पूर्ण केले. यशवंतराव मुक्त विद्यापीठाची बीए पदवी तर राज्यशास्त्रात नागपूर विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी घेतली आहे. प्रशासकीय अधिकारी होण्याचे तिचे स्वप्न होते. ते यासाठी खाजगी नोकरी सोडून तिने सन २०१७ पासून स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. प्रितींच्या आईवडिलांना या परीक्षाबद्दल अधिक माहिती नव्हती. परंतु त्यांनी प्रितीला पूर्ण स्वायत्तता दिली.

विशेष म्हणजे कुठल्याही प्रकारचे शिकवणी वर्ग वा मार्गदर्शन नसतानाही ध्येय डोळ्यासमोर ठेवून नियोजनपूर्वक अभ्यास केला. २०१९ मध्ये पोलिस उपनिरीक्षक पदासाठी परीक्षा दिली. या परीक्षेचा निकाल २५ मार्च रोजी जाहीर झाला. ही परीक्षा प्रीतीने २१६ गुणांसह यशस्वीरित्या उत्तीर्ण केली असून ओबीसी प्रवर्गात महाराष्ट्रातून सतरावा क्रमांक पटकावला. यापूर्वी आमगाव तालुक्यातील कातुर्ली या खेडेगावातील मोसमी कटरे हिने गतवर्षी पीएसआयची परीक्षा उत्तीर्ण केली होती. प्रीती ही पवार समाजातील दुसऱ्या पोलिस महिला अधिकारी होणार असून त्यांच्यावर सर्व स्तरावर करून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिल्ह्यातील युवक -युवतींनी प्रशासकीय सेवेसाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करावी व संयमाने पुढे जावे. अभ्यासासाठी मोबाईल, इंटरनेट आवश्यक आहे. मात्र, अभ्यास करताना सोशल मीडियापासून दूर राहिले तर बरे. समाजात मुलगी वयात आल्यावर प्रत्येक आईवडीलांना मुलींच्या लग्नाची घाई होते. ते अशी घाई माझ्या आईवडीलांनाही होती. मात्र, माझे स्वप्न त्यांना सांगितल्यावर त्यांनी ते पूर्ण करण्यासाठी मला पाठींबा व प्रोत्साहन दिले. त्यामुळे मुलींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येक आईवडीलांनी त्यांना प्रोत्साहन देऊन लग्नाची घाई न करण्याचा मानसही प्रीतीने व्यक्त केला.

# बोनसच्या मागणीसाठी भाजपचा महाविकास आघाडी सरकार विरोधात मोर्चा

## उपविभागीय अधिकारीमार्फत मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

**गोंदिया :** धान उत्पादक शेतकरी बांधवांना खरीप हंगामात बोनस देण्यात आले नाही व नुकतेच महाविकास आघाडी सरकारने यापुढे बोनस दिले जाणार नसल्याची घोषणा विधानसभेत केली. शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च निघत नसल्याने शेतकरी अडचणीत आलेला आहे. त्यामुळे शासनाने धानाला प्रति क्विंटल ७०० रूपये बोनस देण्यात यावे, यासह इतर मागण्यांसाठी आज २५ मार्च रोजी भारतीय जनता पाटी किसान आघाडीतर्फे गोंदिया शहर ग्रामीण मंडळ व दवणीवाडा मंडळातर्फे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर महविकासआघाडी सरकार विरोधात मोर्चा काढण्यात आला.

मोर्चा भाजप कार्यालयातून गांधी प्रतिमा चौक ते जयस्तंभ चौक होत उपविभागीय कार्यालयात पोहचला. मोर्च्यात डफळी वाजवत महाविकास आघाडी सरकारचे निषेध असलेले फलक घेत कार्यकर्त्यांद्वारे आघाडी सरकारच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या नावे असलेले निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने स्विकारले.

निवेदनात इतर मागण्यांमध्ये शेती पंपाची विद्युत बिलाची जबरन वसूल बंद करावी व बिना रिडींग बिल देणे बंद करावे, शेतकऱ्यांचे धानाचे उर्वरित चुकारे त्वरित देण्यात यावे. शेतात हैदोस घालुन नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांची वन विभागाने व्यवस्था करावी, अन्यथा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर कुंपण करण्याची व्यवस्था करावी. धान खरेदीत होणारी लुट थांबवावी, जिल्ह्यात रोजगार हमीची कामे सुरू करुन मजुरांच्या हाताना काम द्यावे. शेतकऱ्यांच्या घरकुल कामांचे मस्टर बुक, जॉबकार्डची रक्कम देण्यात यावी आदि मागण्यांचा समावेश होता.

यावेळी मोर्च्यात प्रामुख्याने माजी आ. रमेश कुथे, माजी जि.प. अध्यक्ष नेतराम कटरे, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, भंडारा-गोंदिया संपर्क प्रमुख विरेंद्र अंजनकर, जिल्हा महामंत्री संघटन संजय कुलकर्णी, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भावना कदम, ओबीसी आघाडी जिल्हाध्यक्ष गजेन्द्र फुंडे, महिला मोर्चा जिल्हा प्रभारी सिता रहांगडाले, आदि मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा ३ एप्रिलला

**गोंदिया :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित महाराष्ट्र गट-क संयुक्त सेवा पूर्व परीक्षा-२०२१ दिनांक ३ एप्रिल २०२२ रोजी जिल्ह्यातील ९ उपकेंद्रावर एका सत्रात सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत गोंदिया येथील एस.एस.गर्ल्स कॉलेज विठ्ठलनगर, एस.एस.अग्रवाल मुन्सीपल गर्ल्स हायस्कुल विठ्ठीलनगर, श्री महावीर मारवाडी हायस्कुल आणि ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स विठ्ठलनगर, मनोहर मुन्सीपल हायस्कुल आणि ज्युनियर कॉलेज इंदिरा गांधी स्टेडियम जवळ, गुजराती नॅशनल हायस्कूल रेलटोली, बी.एन.आदर्श सिंधी विद्यामंदिर हायस्कूल मुरी रोड, साकेत पब्लिक स्कुल बजाज नगर फुलचूर रोड, विवेक मंदिर स्कूल हरिओम कॉलनी छोटा गोंदिया, राजस्थान कन्या विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज ऑफ आर्टस कृष्णपुरा वार्ड गोंदिया या परीक्षा केंद्रावर ही परीक्षा घेण्यात येणार आहे.

परीक्षा केंद्राच्या २०० मीटर परिसरात कोणासही कसल्याही प्रकारचे अस्त्र, शस्त्र व कुठल्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक उपकरणे उदा. कॅलक्युलेटर, मोबाईल, लॅपटॉप, पेजर, फॅक्स मशीन, झेरॉक्स मशीन इत्यादींचा वापर किंवा जवळ बाळगण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. या परीक्षा प्रक्रिये दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ची कलम १४४ चे मनाई आदेश लागू करण्यात आले आहे. सदर आदेश ३ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ८ वाजेपासून ते दुपारी १ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी जयराम देशपांडे यांनी कळविले आहे.

# कालवा दुरुस्ती व रस्ते बांधकामासाठी ५५ कोटीचा निधी मंजूर

**देवरी:-** आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्रातील वाघ प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या सिरपूरबांध, पुजारीटोला व कालीसराड धरणातील उजवा व डाव्या कालव्याच्या दुरुस्ती व नवीनीकरणकरिता २५ कोटी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत नवीन रस्ते बांधकामाकरिता २५ कोटी व आदिवासी बांधकाम विभागातंर्गत रस्ते बांधकामाकरिता ५ कोटी असा एकूण ५५ कोटी रुपयांची निधी राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आला आहे. यासाठी आ. सहषराम कोरोटे मागील दोन वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा करीत होते.



सिरपूरबांध धरणासोबत पुजारीटोला व कालीसराड धरणाचे बांधकाम १९७० साली महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले. या धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्याच्या माध्यमातून महाराष्ट्र व मध्यप्रदेशात एकूण ५० हजार हेक्टर शेतजमिनीचे सिंचन केले जाते. परंतु मागील ५० वर्षांपासून धरणातून सिंचनाकरिता तयार करण्यात आलेल्या उजव्या कालव्याचे ६५ किमी व डाव्या कालव्याचे ६० किमी अंतर कालव्याची दुरुस्ती झाली नाही. परिणामी जवळपास १० हजार हेक्टर शेतजमिनीच्या सिंचनाचे पाणी वाया जात आहे.

या कालव्याच्या दुरुस्तीचा मुद्दा आ. कोरोटे यांनी मागील २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात ठेवून १३३ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली. परंतु त्यावेळी राज्यात कोरोना प्रादुर्भाव असल्याने शासनाने निधी उपलब्ध करून दिली नाही. त्यानंतरही आ. कोरोटे यांनी निधीसाठी वारंवार शासनाकडे मागणी केली.

अखेर यावर्षीच्या राज्याच्या अर्थसंकल्पत २५ कोटी रुपयांची निधी मंजूर करण्यात आली. या निधीतून कालव्याच्या मातीकाम, लाईनिंग व नवीनीकरण दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे कालव्यातून वाया जाणारे पाणी १० हजार हेक्टर शेती जमिनीच्या सिंचनाला मिळणार आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २५ कोटी रुपये निधी व आदिवासी बांधकाम विभागाकडून ५ कोटी रुपया निधी रस्ते बांधकामासाठी मंजूर करण्यात आला आहे.

# प्रस्ताव पाठवूनही रेल्वे तलाव बकालच

**गोंदिया:** शहराच्या मध्यभागी रेल्वे प्रशासनाच्या जागेवर सुमारे २६ एकर जागेत प्रशस्त असे तलाव आहे. या तलावातील पाणी सिंचनाच्या कामी देखील येत नाही. तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता येथील पालिकेचे पदाधिकारी तसेच इतर नेते प्रयत्नशील आहेत. मात्र अद्यप ठोस पाऊल उचलले गेले नव्हते. पालिकेने हा मुद्दा प्रामुख्याने घेत सौंदर्यीकरणाचा आराखडा तयार केला. त्याला पालिकेने मंजुरी देखील दिली. २५ कोटी रूपयांचा प्रस्ताव असून शासनाकडे सादर करण्यात आला. त्यानंतर सातत्यने त्याचा पाठपुरावा झाला, परंतु अद्यापही त्या प्रस्तावावर सकारात्मक तोडगा निघाला नसल्याने तलाव अद्यापही बकाल स्वरूपात आहे.



गोंदिया शहराच्या पश्चिम भागात रेल्वेच्या मालकीचे तलाव आहे. या तलावातील पाणी आजघडीला रेल्वेप्रशासन वापरत आहे. जुन्या काळात रेल्वे प्रशासनेच आपली पाण्याची गरज भागविण्याकरिता या तलावाचे बांधकाम केले होते. मात्र सध्या फक्त रेल्वे गाडया धुण्याकरिता येथील पाण्याचा वापर होतो. त्यामुळे तलावाकडे दुर्लक्ष झाले. तलावाच्या दोन बाजूच्या जमीनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले. तलावात गाळ साचले असून जलपणीचे साम्राज्य आहे. हा तलाव सौंदर्याच्या प्रतीक्षेत होता. दोन वर्षापुर्वी नगर पालिकेचे अध्यक्ष अशोकरव इंगळे आणि प्रभाग १४ चे नगरसेवक कल्लू यादव, पंकज यादव यांनी पुढाकार घेत तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता प्रयत्न केले.

सौंदर्यीकरणासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याशी देखील चर्चा झाली. त्यांनी प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करण्यासंदर्भात सूचना केली होती. त्यानुसार पालिकेने २७ जुलै २०१८ रोजी सौंदर्यीकरणास मंजूरी प्रदान केली. २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला. तो शासनाकडे सादर करण्यात आला. गेल्या कित्येक दशकांपासून बकाल अवस्थेत असणारा हा तलाव आता कात टाकणार, अशी अपेक्षा होती. परंतु अद्यापही त्या प्रस्तावावर कसल्याही प्रकारचा सकारात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला नाही. त्यामुळे तो प्रस्तावर शासनदरबारी तसाच पडून आहे.

## सौंदर्यीकरणात या कामांचा होता समावेश

**सौंदर्यीकरण करताना तलावाच्या चारही बाजूला पायी चालण्याकरिता वाकिंग ट्रॅक तयार करण्यात येणार आहे. त्यावर ठिकठिकाणी विद्युत रोषणाई होणार आहे. तलावाच्या मध्यभागी टापू तयार करुन त्याठिकाणी बगीचा तयार करणे, बागेत भगवान शंकर आणि सिंधी समाजाचे आराध्य झुलेलाल यांची प्रतीमा ठेवणे आणि टापूवर जाण्याकरिता रस्ता यासह सुरक्षा भींत, नौकान्यान यांचा समावेश होता.**

## यापुर्वीही झाले प्रयत्न

**यापुर्वी देखील रेल्वे तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता अनेकदा प्रयत्न करण्यात आले. खुद्द तत्कालीन केंद्रीयमंत्री प्रफुल पटेल यांनी तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता तत्कालीन रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. तत्कालीन खासदार चुन्नीलाल ठाकुर यांनी देखील पत्रव्यवहार करण्याची मागणी रेल्वेमंत्रालयाकडे केली होती. सध्या राज्यात महाविकास आघाडीचे शासन आहे. खासदार प्रफुल्ल पटेल यांचे राज्य शासनात वजन आहे. त्यामुळे त्यांनी या विषयाता पुन्हा हात घालून विषय मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे.**

# पोलीस पाटलांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करा

**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने गृह मंत्री दिलीप वळसेपाटील, जलसंपदामंत्री जयंत पाटील व सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांना निवेदन देऊन पोलीस पाटलाचे सेवानिवृत्तीचेवय ६५ करावेव सेवानिवृत्त पोलीस पाटलांसाठी सेवानिवृत्तीची योजना सुरूकरण्याची मागणी केली.

पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची मंगळवारी मुंबई येथे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासोबत बैठक पार पडली. संघटनेचे कार्याध्यक्ष भृंगराज परशुरामकर यांनी गृहमंत्र्याची भेट घेऊन त्यांना ग्राम पोलीस अधिनियम १९६७ मध्ये दुरुस्ती करुन पोलीस पाटलांच्या सेवानिवृत्तीचे वय ६५ करण्याची मागणी केली.

सेवानिवृत्त पोलीस पाटलांना अत्यंत हलाखीचे जीवन जगावेलागत आहे. त्यामुळे त्यांना सेवानिवृत्तीची योजना सुरू करावी, अशी मागणी केली. कोरोना संक्रमणामुळे मृत्यू पावलेल्या पोलीस पाटलांच्या वारसानांना विम्याची ५० लक्ष रुपये लवकरात लवकर देण्यात यावे. यावर गृहमंत्री वळसे पाटील यांनी शासनस्तरावर याबाबत लवकरच कार्यवाही केली जाईल, असे सांगितले. ना. अमित देशमुख यांना सर्व सेवानिवृत्त पोलीस पाटलांचा वृद्ध कलावंत मानधन योजनेत समाविष्ट करावे, अशी मागणी केली. पोलीस पाटील गाव पातळीवर शासनाचा प्रतिनिधी म्हणून कार्य करीत असून तो पीडित लोकांना मार्गदर्शन करतो. महात्मा गांधी तंटामुक्त समितीचा निमंत्रक म्हणून गावातील तंटे गावातच मिटविण्यात मदत करतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक म्हणून सेवानिवृत्त पोलीस पाटलांना मदत करावी, अशी मागणी केली. ना. अमित देशमुख यांनी याची दखल घेऊन मदत करण्याचेआश्वासन दिले. याप्रसंगी आ. मनोहर चंद्रिकापुरे, भृंगराज परशुरामकर, जब्बारभाई पठाण व आर.बी. वाढई उपस्थित होते.

